

शिरडी संस्थानचे अधिकृत मासिक

५० न. पैसे

## या अंकांत—


- सारें लक्ष भगवंताकडे
- रामनामाचा महिमा
- भारतीय संस्कृतीचें श्रेष्ठत्व
- श्रीकृष्ण चरित्र रहस्य
- देव भावाचा भुकेला
- श्रीसाई सच्चरित - गद्यानुवाद
- श्रीकृष्णभक्त रमावल्लभदास
- श्रीगुरु ग्रंथांतील नामदेवाची वाणी
- संत समागम गोड
- परमात्म शक्तीचा अनुभव
- भगवान् व्यासाचें चिरंजीव कार्य
- साधक आणि साधना
- सद्‌गुरु कृपेचें केवढें हें महात्म्य
- बाबांच्या लीला


सप्टेंबर १९६१

स्थापना १९१६




सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

**ई. आर. मालपेकर**

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१



# श्री साई वाक्सुधा

नाना प्रयत्न करून जें इतरांना साध्य होत नाहीं तें जो कोणी सद्‌गुरूवर संपूर्ण श्रद्धा ठेवील त्याला अल्पावकाशांत व अल्प प्रयासानें साध्य होऊं शकतें; परंतु सद्‌गुरुवर अत्यंत दृढ श्रद्धा मात्र पाहिजे. सद्‌गुरूला शरण गेलें असतां ब्रह्मज्ञानाची प्राप्ति होते. निष्काम कर्म हें साध्य झालें पाहिजे. प्रत्येक गोष्ट देवाच्या नांवें व देवासाठीं करावयाची, अशा समर्पण बुद्धीनें जो वागतो व ज्याला तें साध्य झालें तेथें सच्चिदानंद स्वरूप स्थिरावलें आहे म्हणून समजावें. त्यानें स्वतःला ओळखलें; मग त्याला या जगांत मिळवायचें असें काय राहिलें? त्यासाठीं तर नाना धडपडी व यातायाती करावयाच्या. स्वतःची ओळख पटणें, आपणच सच्चिदानंद स्वरुप आहोंत याची जाणीव होणें म्हणजेच मोक्ष मिळविणें. या मानव जन्माला येऊन साधावयाचें असें जर कांहीं असेल तर तेंच होय. त्यासाठीं नाना प्रयत्न करावयाचे असतात. ब्रह्मयोग साधावयाचा तो निष्ठेशिवाय साध्य होत नाहीं. त्यासाठीं अंतर्मुख व्हावें लागतें. मींच ब्रह्म आहे, याची रोमरोमीं जाणीव व्हावी लागते. मनांत नाना प्रकारच्या हालचाली, नाना लाटा, व नाना खळबळी सुरू होतात; याचें कारण स्वस्वरूपाची ओळख पटलेली नसते हेंच होय. ती ओळख सद्‌गुरूच्या मार्गदर्शनानें होऊन मोक्ष आपल्या हातीं येतो.

—श्रीसाईसच्चरित


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४० वें ] सप्टेंबर १९६१ [ अंक ६ वा

: संपादक :

गो. वि. क्षीरसागर

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

'साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं ८०४ बी, दादर, मुंबई १४

# प्रिय वाचक—

आम्हीं सप्टेंबरचे अंकांत दैवी चमत्कार या विषयावर दोन शब्द लिहिण्याचें योजिलें आहे. पुण्यांतील महाप्रलयाच्या हकीगती आपणापैकीं बहुतेकानीं वाचल्या असतीलच, त्याबरोबर निरनिराळया प्रदेशांत पुरानें केलेल्या महाभंयकर हानीची कल्पना वाचकांस आहेच. या प्रलयकालीं दैवी आपत्तींतून जे शीरसलामत वाचले ते खरोखरच धन्य होत.

पूरग्रस्तांच्या कांहीं हकीकती व वृत्तपत्रांतील माहितीची 'कात्रणें आम्ही' एकत्र करून "दैवी चमत्कार" या विषयावर दोन शब्द लिहीण्याचें ठरविलें आहे.

'रसरंग' ता. २२ जूलै ६१ मध्यें पान ११ कॉलम ३ या मध्यें पुण्याचे वसंत शिन्दे लिहीतात "खुर्च्या, टेबले, कपाटे, चिखलानें माखलीं होती. टेबलावर श्रीसाईबाबांचें चित्र असलेला एक रुमाल होता, परंतु त्यावर चिखलाचा एकही डाग पडला नव्हता, अगदीं पूर्वी होता तसाच तो पांढरा शुभ्र राहिला होता.

'तरूणभारत' २ ऑगस्ट ६१ चे अंकांत खालील मजकूर आला आहे. 'पुण्यांत जो जलप्रलय झाला त्यांत गायकवाड वाड्यांतील लोकमान्य टिळकांचे ग्रंथ भिजले, परंतु हस्त लिखीतें मात्र भिजलीं नाहींत.'

'गांवकरी' १९ जुलै ६१ मध्यें सात महिन्यांची मुलगी योगिनी हिची हकीगत आलेली आहे, ती वाचनीय आहे. तसेंच कसब्यांतील एक शिंदे कुटुंब हल्ली शिर्डी मुक्कामीं आहे. त्यांचीही हकीगत दैवी चमत्कारानें परिपूर्ण अशीच आहे. सात वर्षा-खालील चार मुलें घेऊन बाई प्रत्यक्ष कमरे इतक्या पाण्यांतून घरांतून बाहेर पडली. पण कोणासही कांहींच इजा न होतां शिर्डीस येऊन पोहोचली. तसेंच श्री. नानासाहेब रासने यांच्या चाळी व साई मंदीर मुठा नदीचे किनाऱ्यावर असल्यामुळें फक्त चाळीच वाहून गेल्या पण श्री साईचे मंदिरास किंचीतही धक्का लागला नाहीं. ही हकीगत स्वतः नानासाहेबांनीं भक्त गणांस आमचे समक्ष सांगितली. व ती सत्य असल्याबद्दल पुण्यां-तील भक्तांनीं कळविलें आहे.

या शिवाय आमचेकडे निरनिराळया प्रांतांतून बरींच पत्रें आलीं असून त्यांत बाबांचे दैवी चमत्काराबद्दलचें बरेच विस्तृत वर्णन आलेलें आहे. त्या हकीगती वेळेनुसार आम्हीं साईलिलेंत प्रसिद्ध करूंच.

यावर असा प्रश्न उद्भवतो कीं वरील गोष्टींत नुसता योगायोगच आहे किंवा त्यांत कांहीं दैवी सामर्थ्य आहे असा संभ्रम निर्माण होतो.

## योगः कर्मसु कौशलम् ।

या भगवंताचे वचनावरून योग हा कौशल्यपूर्ण मार्गानें जर अभ्यासिला तर योग साधना होते, असें म्हणतां येईल आणि योगाचा अर्थ त्यांतूनच ध्वनीत होईल. जर योग साधनेकरतां कौशल्यपूर्ण मार्गाचा अवलंब करून योग सिद्धी प्राप्त होते, तर ती सर्वांस साध्य होणें पर्यायानें आलेंच. परंतु या लौकीक जगांत तसें इष्टोत्पत्तीस येत नाहीं. तेव्हां योगसाधनेकरतां तपोबलाची व उपासनेची जोड हवीच, परंतु दैवी चमत्कार घडत असतांना अशा साधनेची जरूरी नसावी असें वाटतें. कारण उपास्य देवतेकडून संकटकाळीं मार्गदर्शन होणें अपरिहार्य आहे. उपास्य देवतेकडून उपासकाचा उद्धार झाल्याचीं अनेक उदाहरणें पुराणांत सांगितलीं आहेत, आणि तें योग्यच आहे, कारण —

मूकम् करोति वाचालम् ।
पंगुम् लंघयते गिरिम् ॥

ह्या लौकीक जगांत सर्वचक्षु, सर्वज्ञाता व सम्यकप्रणीता अशा परमेश्वराकडून भक्तांचा पुनरुद्धार हेंच ह्या चमत्काराचे मुळाशी आहे हें पर्यायानें सिद्ध होतें. शास्त्रीय युगांत अणुअस्त्रासारखे संहारक अस्त्र एकीकडे उत्पन्न होत असतां 'हायड्रोजन व कोबाल्टबॉम्ब जगांचा अंतकाल जवळ आणित असतां या सर्व संहारांतून मनुष्य जातीस वाचविण्याची शक्ति या जगांत अदृश्य रुपानें वावरत असणारच, हें निर्विवाद आहे. आणि अशी शक्ती जोंपर्यंत या लौकिक जगांत वावरत आहे तोंपर्यंत मानव जातीचा संहार करणारीं अस्त्रें ही निकामी ठरणार हेंहि सत्य आहे. परंतु आपण आपल्या अध्यात्म देवतेवर पूर्ण विश्वास ठेवून व भक्तीभावानें पुजीलेल्या दैवताची अहर्निश पूजा अर्चा व मनन करून या जगांतील संहारक शक्तिवर विजय मिळविणें शक्य आहे असें आमचें ठाम मत झालें आहे. वैज्ञानिक युगांतील शास्त्रज्ञ सांगतात कीं दैवी चमत्काराच्या कल्पना भोळ्याभाबड्या जनतेला कार्यविन्मुख करतात. परंतु त्यांच्या ज्ञानाविषयीं आम्ही आदरपूर्वक कृतज्ञता व्यक्त करून, एवढेंच सांगूं इच्छितों कीं—

अतर्क्य महिमा तुझा ।
प्रभू तुझी कृपा नाव दे ॥

या मोरोपंतांच्या उक्तीप्रमाणें शास्त्रज्ञाचे तर्काबाहेर निराळें जग आहे आणि परमेश्वरी अस्तित्व तर्क शास्त्राचें कक्षेबाहेर आहे, एवढेंच सांगून आम्हीं हा लेख पूर्ण करतों.

—संपादक




## पुण्याच्या महापुरांतील अनुभव—

श्री. **रघुनाथ बाबूराव सांडभोर**, रा. कसबा पेठ, साततोटीजवळ, गोखले यांचा वाडा, पुणें नं. २ हे पुणें येथें गेल्या महापुरांत आलेल्या अनुभवासंबंधानें लिहितात कीं, मी वयाच्या दहाव्या वर्षापासून नित्यनेमानें शिरडीस बाबांच्या दर्शनार्थ जात आलों आहे. गेल्या गुरुपौर्णिमेस मी शिरडीस गेलों तो किती वेगळ्या परिस्थितींत! त्याचें असें झालें.

दि. १२ जुलै १९६१ रोजीं सकाळीं ११ वाजतां पुण्याचे पश्चिमेकडील पानशेत व खडकवासला हीं दोन धरणें फुटून अकस्मात जलप्रलय झाला. त्या पुरानें नदीच्या दोन्ही बाजूंची घरें दारें पार वाहून गेली, अनेक जीव गमावले व हजारोंचे जीवन बरबाद झालें. अशा या महान संकटांत ते व त्यांचें कुटुंब सही सलामत बचावलें. तें असें–ते स्वत: १०॥ वाजतां नेहमी प्रमाणें ऑफिसला खडकीस गेले. तेथें गेल्यावर त्यांना पाण्याचा लोंढा येऊन पुण्यावर कोसळलेले संकट कळलें त्यामुळें साहजिकच बायका मुलांसंबंधानें त्यांना फार काळजी वाटूं लागली. नदीस पाणी फार असल्यानें रात्रौ ७॥ वाजेपर्यंत त्यांना घरी येतां आले नाहीं. पाणी ओसरल्यावर ते घरी आले. खोली उघडून पाहतात तो सर्वत्र पाणी येऊन चिखल झालेला. परंतु खोलीचे मध्य भागावर श्री साईबाबांची मोठी तसबीर लावलेली जमीनीच्या तळी असून फक्त पाणी त्यांचे पायापर्यंत लागून ओसरलें होतें, घरांत बायको व ३ मुलें वय ९|६|२ ची होती. ती दिसत ना. तेव्हां शेजाऱ्यांनीं सांगितलें कीं तुमचे पाठोपाठ अचानक एक बाई येऊन तुमचे कुटुंब व मुलें नदीस पाणी येण्यापूर्वींच घेऊन गेली. चौकशी करतां कळलें कीं त्यांचे भजनी मेळ्यापैकीं एक श्री. वरगडे यांची मुलगी शिंदे आळींत रहात असलेली पुराचे पाणी पाहण्यास गेली असतां तिला अचानक असें वाटलें कीं आपले सांडभोर यांची मंडळी भोळी आहेत त्यामुळें पुरांत त्यांना धोका पोचण्याचा संभव आहे. सबब ती तडक आमचे घरी येऊन ती त्या सर्वांना आपले घरी घेऊन गेली व अशा तऱ्हेनें श्री बाबांचे कृपेनें हें सर्व कुटुंब या महा संकटातून बचावलें व त्यांचे कृपे मुळेंच ते या गुरू पौर्णिमेस शिरडी येथें आनंदांत येऊं शकले.

× × ×

## संकटमुक्त करणारे बाबा

श्री. अनंतराय पारीख, ५२५ कृष्णनगर भावनगर हे साईबाबांचे भक्त असून गेल्या १/२ वर्षांत आपणास श्रीसाईबाबांच्या कृपेसंबंधीं आलेल्या अनुभवांची माहिती करून देतांना लिहितात कीं, ता. २४ नोव्हेंबर १९६० रोजीं माझी रिटा नावाची आठ वर्षें वयाची मुलगी शाळेच्या बसमधून उतरून घरीं येत होती. इतक्यांत एक मोटार आडवी येऊन तिला जबरदस्त धक्का बसल्यामुळें ती बेशुद्ध होऊन पडली. तो गुरुवार होता. माझी प्रकृति ठीक नसल्यामुळें मी दुकानांत गेलों नव्हतों. घराजवळ हा अपघात झाला. गाडीचा ड्रायव्हर व इतर कांहीं मंडळी आमच्या घरीं मुलीच्या अपघाताची वार्ता सांगण्यासाठीं आली. मी तावडतोब बाहेर येऊन पाहिलें तों रिटा भयंकर अपघातांत सांपडलेली! काय करणार! तिला तावडतोब डॉ. कामदार यांच्या इस्पितळांत घेऊन गेलों. जात असतां मी श्रीसाईबाबांस आळवीत चाललों होतों. बाबांना प्रार्थना करीत होतों कीं, हे बाबा! हें माझें नसून तुमच्यावरील संकट आहे. रिटा तुमचीच आहे. ती जर या अपघातांत दगावली तर लोक म्हणतील कीं, अंतूभाई साईबाबांचा परमभक्त असतां त्याच्यावर हें एवढें मोठें संकट कसें ओढवलें? तेव्हां तूंच तिचा रक्षणकर्ता. आज गुरुवार आहे. रिटाला लौकर आराम वाटेल असें करा. ती चालती फिरती होतांच तिला घेऊन मी प्रथम तुमच्या दर्शनासाठीं शिर्डीस येईन. तुम्हांला अभिषेक करवीन व नंतर तिला शाळेंत पाठवीन. माझ्यावर एवढी कृपा करा. त्यानंतर थोड्याच महिन्यांनीं रिटा त्या अपघातांतून चांगली झाली. हिंडूं फिरूं लागली. नंतर मी, माझी पत्नी दोन मुलगे व कन्या रिटा यांच्यासह शिरडीस श्रीबाबांच्या दर्शनार्थ गेलों. प्रथम मुंबई नंतर नाशीक व नाशीकहून ता. १९ एप्रील १९६१ रोजीं शिरडीस पोहोंचलों. तेथें गेल्यावर अभिषेक वगैरे नैमित्तिक कार्यक्रम आटोपून विश्रांती घेतली. सायंकाळी आम्हीं सर्वजण लेंडीबागेंत गेलों. मुलें एका उंच ओटल्यावर खेळत होतीं. इतक्यांत चार वर्षें वयाचा अतुल नांवाचा माझा मुलगा खालीं कोसळला व खालीं विटांच्या तुकड्यांचा ढीग होता त्यांत पडला. आम्हीं दुसरीकडे एका बाजूस बाबांच्या मूर्तीचें ध्यान करीत बसलों. ज्या ठिकाणीं अतुल पडला तेथें जवळच कांहीं मंडळी बसली होती. त्यानीं त्याला पडतांना पाहून वर उचललें व आम्हीं बसलों होतों तेथें आणिलें व कसा पडला तें सांगितलें. अतुलला बेरच लागल्यामुळें तो बेभान झालेला होता. आम्हीं बाबांच्या दर्शनास आलों आणि हें काय नवीन संकट ओढवलें! असें विचार मनांत घोळताहेत तोंच तेथें एक महाराष्ट्रीय भगिनी आली व अतुलला उचलून तेथील श्रीबाबांच्या तसबिरीपुढें घेऊन गेली व त्याचे दोन्ही हात त्यांच्यापुढें जोडतांच अतुलनें डोळे उघडले व खाली उतरून जणूं काय कांहींच झालें नाहीं अशा रीतीनें तो नाचूं

# सारें लक्ष भगवंताकडे

**भगवान रामकृष्ण परमहंस यांचीं बोधवचनें म्हणजे उपनिषदेंच होत. श्री. सी. राजगोपालाचारी यांनीं त्यांना सुंदर साज चढविला असून, आमच्या वाचकांसाठीं त्यांचा सुबोध अनुवाद क्रमशः देण्यांत येत आहे.**

**— संपादक**

श्रीरामकृष्णाच्या भक्तांपैकीं एकाला सरकारी कामकाज करून देण्याचें कंत्राट मिळालें परंतु तें स्विकारावें कीं नाहीं याबद्दल त्याच्या मनांत संशय उत्पन्न झाला. त्याचें निरसन करून घेण्यासाठीं तो श्रीरामकृष्णाकडे जाऊन विचारूं लागला कीं, दोन पैसे मिळविण्यासाठीं तें काम मी पत्करणें योग्य होईल का ?

यावर श्रीरामकृष्ण म्हणाले, " बाबारे ! तुला तुझ्या आईचें पालनपोषण करावयाचें आहे. ती जबाबदारी पार पाडण्यासाठीं, काम करून दोन पैसे मिळविणें तुला जरूरीचें आहे. तेव्हां तुझें धोरण चुकीचें मुळींच नाहीं. तुझ्यावर कोणी अवलंबून नसतें तर मात्र गोष्ट वेगळी होती. देवाचें नांव घे आणि काम सुरू कर व तें मन लावून ठरलेल्या मुदतींत पार पाडण्याची कोशीस कर म्हणजे झालें. "

या जगांत किती तरी माणसें अशीं आहेत, कीं जीं केवळ संपत्तीच्या व अधिकाराच्या मागें लागलेलीं आहेत. त्याचबरोबर त्यांच्यांत बेदरकारपणा व अहंकार यांचा शिरकाव होत असतो. पुष्कळ लोकांना संपत्तिवानांचें व अधिकार पदावर असलेल्यांचें भारी आकर्षण असतें, त्यांच्याबद्दल त्यांना एक प्रकारचा दबदबा वाटत असतो.

---

फिरूं लागला. मी त्याच्या अंगावर हात फिरवून पाहिलें. त्याला जखम वगैरे कांहीं झाली नव्हती ही केवळ श्रीसाईबाबांचीच कृपा होय.

शिरडीस असलेल्या मुदतींत आम्हीं बाबाना अभिषेक केला, श्रीसाई सत्यनारायण पूजा वगैरे कार्यक्रम भक्तिभावानें केलें. भक्तिभावाचा भरपूर आनंद लुटून आम्हीं तेथून टॅक्सीनें नाशीकला गेलों. तेथून आम्हीं ट्रेननें मुंबईस आलों. मुंबईत श्रीसाईधाम फणस वाडीतील श्रीसाई मंदिर गोवालिया टँक वरील साईमंदिर वगैरे सर्व साईस्थानांचें दर्शन घेतलें. आठ दिवस श्रीसाईबाबांच्या स्मरणांत मुंबईतही मोठ्या मजेंत घालविले.

आणि शेवटीं ता. ३० एप्रिल १९६१ रोजीं भावनगरला श्रीबाबांच्या कृपेनें सुखरूप येऊन पोहोंचलों.

## अळवावरचें पाणी

परंतु संपत्ति काय किंवा अधिकार काय हीं शाश्वत टिकून रहाणारी नाहींत. अळवावरचें पाणी; जेव्हां मृत्यूचें बोलावणें येतें तेव्हां सारें येथल्या येथें सोडून रिक्त हातांनीं जावें लागतें. बरोबर संपदा येत नाहीं कीं उच्चाधिकारही येत नाहीं. मग त्यांना कां म्हणून एवढें महत्त्व द्यावयाचें ? त्यांचा एवढा बाऊ कशाला म्हणून ? श्रीमंती मिरविणाऱ्यानें नेहमी लक्षांत बाळगावें, कीं या जगांत त्याच्यापेक्षां कितीतरी पटीनें धनाढ्यें असें लोक आहेत. त्यांच्या मानानें त्यांची भिकाऱ्यांत गणना करावी लागेल. या जगांत प्रत्येक क्षेत्रांत एकापेक्षां एक श्रेष्ठ अशीं माणसें आहेत, तेव्हां कोणीहि गर्व मानूं नये.

काळोख पडला म्हणजे काजवे चमकू लागतात. आकाशभर मोठ्या तोऱ्यानें मिरवत असतात. त्यांना वाटत असतें कीं, आमच्या ठायीं जो प्रकाश चमकत आहे, त्यामुळेंच जिकडे तिकडे अंधःकार नाहींसा होऊन प्रकाश दिसत असतो. आमच्यासारखे प्रकाशवान् आम्हींच ! परंतु नंतर लौकरच आकाशांत तारे चमकूं लागतात. त्यांच्या प्रकाशापुढें आमचें काय ! असें वाटून त्या लाजेनें वाकतात. त्यांना जाणीव होते कीं, कुठे आकाशांत चमकणारे तारे व कुठें आम्हीं ! त्यांच्या तेजापुढें आमचें कसलें आहे तेज ! आम्हीं उगाच कां म्हणून गर्व करावा ?

नंतर कांहीं वेळानें चांदोबा पूर्ण तेजानें आकाशांत तळपूं लागतो. त्या तेजोराशीपुढें चांदण्याच्या प्रकाशाची तुलना तरी करतां येईल का ? चांदण्या लाजेनें फिक्या पडतात ! चांदोबालाहि वाटत असतें, कीं मी साऱ्या जगाला प्रकाश देऊन उजळून टाकतों. केवढी माझी योग्यता !

इतक्यांत सकाळ होते आणि आकाशांत सहस्ररश्मि सूर्य नारायण पूर्व दिशेकडून डोकावूं लागतो ! आणि मग चंद्रप्रकाशाला पळ काढावा लागतो !

## नम्र झाला भूतां —

असा आहे या जगाचा कारभार ! कोणीही अभिमान बाळगण्याचें कारण नाहीं. यापासून आपणाला कांहींच धडा घेतां येणार नाहीं का ? श्रीमंत व्हा; खूप संपत्तिवान व्हा; परंतु त्याचबरोबर अहंकार टाकून नम्र व्हा; नम्र झाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता । हें नेहमीं लक्षांत ठेवा.

प्रचंड पुलाखालून पाणी झुळझुळ वहात असतें. तें अडकून र नाहीं. एकाच ठिकाणीं थबकून रहात नाहीं. त्यामुळें तें खराब होत नाहीं त्याला दुर्गंध येत नाहीं. कोणतीही गोष्ट असो, ती एकाच ठिकाणीं राहिल म्हणजे कुजली म्हणून समजावें. पाण्याप्रमाणें पैसाही पसरत, घोळत जात येत राहिला पाहिजे. तो तुमच्याच हातांत राहून उपयोगी नाहीं. त्यामुळें तो अपवित्र बनून त्यांतून दुर्गंध यायला लागेल. तसें होऊं देऊं नका. तो बाहेर जाऊं द्या. त्याला घरांतल्या घरांत ठेवून कुजवूं नका. संपदेचे तुम्हीं दास बनूं नका. संपदेला तुमचे दासानुदास बनवा.

## आडमार्ग सोडा

त्या सुताराच्या बायकोकडे पहा. तिचीं सर्व कामें कशीं लक्षपूर्वक चालू आहेत. ती एका हातानें पोहे कांडण्याच्या चक्कींत भात टाकीत आहे तर दुसऱ्या हातानें आपल्या मांडीवरील तान्ह्या बाळास हळुहळु थोपटीत आहे. आणि दोन्हीं हात अशा रीतीनें गुंतले असतां पोहे विकत घेण्यासाठीं आलेल्या गिऱ्हाईकाशीं तिचें बोलणें चालू आहेच. इतकी अवधानें संभाळूनही आपल्या हातांचीं बोटें चिरडून जाणार नाहींत यासाठीं काळजी तिला घ्यावी लागत आहेच. तेव्हां अशा रीतीनें आपल्या सभोंवारच्या जगाशीं वावरत असतां व जगांतील व्यवहार करीत असतां तुमच्या दृष्टीपुढें देवाची मूर्ति सदैव असूं द्या. कधींही आड मार्गानें जाऊं नका; नेहमीं धोपट मार्गानें जा.

एका खांबासभोंवार फिरणाऱ्या चक्रावर तो एक मुलगा बसला आहे. चक्र कितीही जोरानें फिरत असलें तरी तो पडणार नाहीं, त्याचप्रमाणें भगवंताचें स्मरण स्तवन करीत रहा. त्या नांवाला श्रद्धापूर्वक चिकटून रहा. मग या जगांत तुम्हांला कितीही चकरा खाव्या लागल्या किंवा गोलांट्या घ्याव्या लागल्या तरी तुमचें पतन होणार नाहीं.

## एकाग्रता साधा

खेड्यापाड्यांतून विहीरीवर पाणी भरण्यासाठीं जाणाऱ्या बायांचा तांडा आपण पहातों. त्यांच्या मस्तकावर एकावर एक अशा अनेक घागऱ्या व कळशा (पाण्यानें भरलेल्या) रचलेल्या असतात. परंतु त्या भांड्यांतील पाण्याचा एखादाहि थेंब खालीं पडत नाहीं. मस्तकावर भरल्या घागरी घेऊन जात असतां बरोबरच्या मैत्रिणीबरोबर गृहसंसारासंबंधीं त्यांच्या गप्पागोष्टीहि चाललेल्या असतात. तें कौशल्य ध्यानीं आणा आणि तशाच कौशल्यानें आपल्या संसाराचा गाडा चालवा. काय वाटेल तें करा; परंतु देवाचें स्मरण व धोपट मार्ग सोडूं नका.

समर्पण बुद्धीनें तुम्हीं कोणत्याहि गोष्टी करूं लागलां म्हणजे त्याचा संपर्क तुम्हांला बाधणार नाहीं व हातीं घेतलेल्या कार्यांत तुम्हीं यशस्वी व्हाल. कर्मयोग यालाच म्हणतात व भक्तियोग म्हणतात तोहि हाच होय.

एखादा पिकलेला फणस फोडण्यापूर्वीं त्याचा डीक लागून हात खराब होऊं नयेत म्हणून आपण हाताला तेल माखीत असतों. तेल लावल्यानंतर फणस फोडून आंतील गरे आपण काढूं शकतो. मग डिंकामुळें उपद्रव होत नाहीं. त्याचप्रमाणें आपण श्रद्धायुक्त अंतःकरणानें भगवंताला चिकटून राहिलें पाहिजे व आपला संसार व कौटुंबिक व्यवहार चालविले पाहिजेत. अशा रीतीनें आपण वागूं लागलों म्हणजे संपत्तीचा व मायेचा मोह आपणांस बाधूं शकणार नाहीं. मग कितीही संकटें आलीं तरी मन दुःखी कष्टी होणार नाहीं.

---

# भारतीय संस्कृतीचें श्रेष्ठत्व

**भारतीय संस्कृति अनेक बाबतींत श्रेष्ठ आहे. त्या श्रेष्ठत्वाचीं कांहीं लक्षणें आहेत. तीं भारतीयांत दीर्घकाळापासून बद्धमूल झालेलीं आहेत. त्यामुळें कितीहि परचक्रें आलीं तरी हिंदुधर्म ताठ मान करून राहिला आहे. आघात सहन करण्याचें व कोणत्याहि संकटांना तोंड देण्याचें सामर्थ्य त्याच्या ठायीं आहे.**

आम्हीं भारतवासी. भारतांत आमचा जन्म झाला म्हणून आम्हांला अभिमान वाटावा. भारताची विशिष्ट संस्कृति आहे. त्या संस्कृतीचें कांहीं विशिष्ट स्वरूप आहे. तें वैशिष्ट्य इतर कोणत्याहि देशाच्या वांट्याला आलेलें नाहीं. परंपरेनें कांहीं विशिष्ट गुणांचा वारसा आम्हांला मिळत गेला आहे. आमच्यावर मोठमोठीं आक्रमणें झालीं, परचक्रांची फेरी झाली; परंतु आम्हीं नामशेष झालों नाहीं. गेल्या एक हजार वर्षांचा इतिहास पाहिला तरी या देशावर क्रांतिकारक प्रसंग कितीतरी आले व गेले; परंतु तरीहि भारत हिमाचलाप्रमाणें आपली मान ताठ करून उभा आहे तसाच आहे.

## आमचा स्थायीभाव

ईश्वराच्या अस्तित्वावर श्रद्धा हा आमचा एक स्थायीभाव आहे. नास्तिकांचाहि कुठें कुठें सुळसुळाट आढळून येत असला तरी आस्तिकवादानें भारलेला समाज केवढा तरी मोठा आहे. वाटेल तेवढ्या घडामोडी व क्रांत्या घडून येवोत, ईश्वरावरील आमच्या श्रद्धेला कोणी धक्का देऊं शकलेला नाहीं. या जगाचा कर्ता नियंता व सूत्रधार म्हणून कोणी आहे. त्याच्या इच्छेवर या जगाचा सारा कारभार चालू आहे. आम्हीं केवळ त्याच्या हातांतील बाहुलीं आहोंत. ही भावना बहुजनाच्या रोमरोमीं भिनलेली आहे.

आमच्या पूर्वजांना, ऋषी मुनींना या गोष्टींचा प्रत्यक्ष साक्षात्कार झालेला होता. त्या साक्षात्कारानें ते भारावून गेले होते. त्यांचेच वंशज आम्हीं.

'एको देवः सर्वभुतेषु गूढः सर्वभूतान्तरात्मा' ही आहे प्राचीन काळापासून चालत आलेली आमची संस्कृति. या संस्कृतीचें विश्वव्यापित्व शब्दांनीं वर्णन करतां येण्यासारखें नाहीं. या गोष्टीची जाणीव व्हावी लागते व ती होण्याचे मार्ग वेद, स्मृति व इतर धर्मशास्त्रांतून सांगण्यांत आले आहेत. त्या मार्गानें जाणारे जात आहेत; परंतु आम्हां भारतवासीयांच्या तत्त्वज्ञानाचा हा आहे मुख्य गाभा. तो हस्तगत व्हावयासाठीं अनादि काळापासून लोक झटत आले आहेत.

## आमची श्रद्धा

या जगांत मनुष्य जन्माला येतो त्याच्यापुढें एक विशिष्ट ध्येय असतें. जन्माला येऊन समजूं लागल्यापासून प्रत्येक मनुष्यानें आपल्या वांट्यास आलेलीं निहित कर्तव्यें इमानें इतबारें पार पाडावयाचीं कर्तव्याचरण करीत असतां जीं सुख-दुःखें वांट्यास येतील तीं हंसतमुखानें भोगावयाचीं. निष्काम वृत्तीनें कर्माचरण करतां करतां मोक्षाचा मार्ग खुला करून घ्यावयाचा व आयुष्याच्या अखेरीपर्यंत त्या मार्गानें वाटचाल करावयाची. त्या जन्मात साध्य होईल तेवढें होईल. त्या ध्येयापर्यंत पोहोंचणारे पूर्व पुण्याईच्या बळावर पोहोंचतातही. एका जन्मांत हें ध्येय नाहीं गांठतां आलें तर दुसऱ्या किंवा तिसऱ्या जन्मांत तरी साध्य होईल ही आशा त्यानें उराशीं बाळगलेली असते.

'अनेक जन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम्' ही त्याची खात्री असते–जीव आपल्या पूर्व कर्मानुसार निरनिराळे जन्म घेतो. ज्याचें आचरण जसें उच्च किंवा कनिष्ठ असेल तसा त्याला कनिष्ठ किंवा उच्च जन्म प्राप्त होत असतो. हा जो सिद्धांत सांगितला त्यावर आम्हां भारतवासी हिंदूंचा पूर्ण विश्वास आहे. त्यामुळें सत्कार्य करण्याकडे मनाचा सहाजिक ओढा असतो.

## करावें तसें भरावें

आमची तिसरी एक श्रद्धा आहे. परमेश्वर न्यायी आहे. त्याच्याकडून कोणाच्याही बाबतींत केव्हांही अन्याय होणार नाहीं. आमच्या वांट्याला दुःख किंवा सुख कां आलें? कारण तें आमच्याच बऱ्यावाईट कर्मांचें फळ. जसें करावें तसें भरावें हा ईश्वरी घरचा न्याय मानणारे आम्हीं आहोंत. आम्हीं दुसऱ्यांना दोष देण्याचें कारण नाहीं.

आमच्याकडून सत्कार्यें घडलीं तर त्यांचें फळ आम्हांला चांगलेंच मिळणार. वाईट कृत्यें घडलीं तर त्याचे दुष्परिणाम भोगायला आम्हीं तयार असलें पाहिजे. ज्याच्या कर्माचा तो धनी. दुसऱ्याच्या वांट्याला त्यांचें सुख किंवा दुःख कां म्हणून जाईल?

'अवश्यमेव भोक्तव्यं कृतं कर्म शुभाशुभम्।' हा ईश्वराघरचा न्याय आहे व तो मानणारे आम्हीं आहोंत. ईश्वर दयामय व करुणाघन आहे. तो कुणाच्याहि बाबतींत उगाच अन्याय केव्हांहि करणार नाहीं. या जगांत आपण आपल्या सभोंवार सुखांत लोळणारीं व दुःखांत होरपळणारीं माणसें पाहतों. सुखी माणसें पाहून आपणांस त्यांचा हेवा वाटत नाहीं. दुःखी माणसें पाहून आपणास त्यांची दया येते.

सर्व प्राणिमात्रांकडे 'आत्मौपम्येन' पहावयाचें हें आहे आमचें वैशिष्ट्य. ईश्वर सर्व प्राणिमात्रांत वास करून राहिलेला आहे ही आहे आमची श्रद्धा. त्यामुळें इतरे-जनांचें सुखदुःख तें आपलेंच सुखदुःख ही भावना मनांत जागी असते.

भारतवासी हिंदु समाजांत अध्यात्मदृष्टि आहे, सर्वांकडे सम दृष्टीनें पहाण्याची भावना आहे, भगवन्ताचें वास्तव्य माझ्यांत आहे तसेंच तें प्रत्येकांत आहे ही आपली श्रद्धा असल्यामुळें आमचा कितीतरी फायदा झालेला आहे. सर्वांकडे सम दृष्टीनें पहा, या सांगण्यांत कसला आला आहे अर्थ! ती भावना अंतर्यामीं स्वाभाविक असावी लागते.

किती बहुमोल गुण आहेत हे! हे गुण अंगीं असतांही हिंदु समाज गेलीं हजारभर वर्षें दास्यत्वांत कां बरें खितपत पडला होता? त्याला उत्तर आहे. कोणत्याही एका समाजाला (व्यक्तीप्रमाणें) सदैव अग्रभागी व सुखासमाधानांत लोळत रहाण्याचा ईश्वरानें ताम्रपट दिलेला नाहीं. रहाटाचे डबे भरायचे, रिकामे व्हायचे, हा चक्रनेमिक्रम सर्व बाबतींत अखंड चालू आहे. या उपक्रमाला हिंदु समाज कसा विरूद्ध जाईल?

आमचा धर्म, आमची संस्कृति, आमचीं शास्त्रें पुराणें सर्व कांहीं उच्च होतीं व आहेत. परंतु तदनुरुप आचरण नको का घडायला? तें घडलें नाहीं. सर्व बाबतींत आम्हीं दुबळे व उणे पडत गेलों आणि त्यामुळें परचक्रांना फावलें. त्यांनीं आम्हांला अधिकाधिक दुर्बल बनविण्यात चढाओढीचा मार्ग स्वीकारला. परंतु इतकेंहि असून, मरणांतिक आघात होऊनही आम्हीं नामशेष होऊं शकलों नाहीं; जिवंत राहू शकलों. याचें कारण आमची उच्च संस्कृति; आमच्या ठायीं बद्धमूल होऊन राहिलेल्या परंपरागत विशिष्ट भावना.

अनेक वर्षांचें पुण्य आज फळास आलें आहे. आम्हांला स्वातंत्र्य मिळालें आहे. आमचे विकासाचे मार्ग मोकळे झाले आहेत. बंधनें दूर झालीं आहेत. याच स्वराज्यांतून सुराज्य निर्माण करण्यासाठीं व भारतवर्ष आदर्श बनविण्यासाठीं आपल्यापैकीं प्रत्येकानें झटावयाचें आहे.

———


# लहान मुलांच्या आंकडीवर

## जुनें आणि प्रसिद्ध औषध

### जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# श्रीकृष्ण-स्तोत्र

[ लेखक : श्री. छत्रे, कल्याण. ]

जे देवकी नी वसुदेव यांसी । माता पिता मानुनि बंदिवासीं ॥
नृदेह घेती खल-नाशना ते । श्रीकृष्ण सर्वत्र दिसोत मातें ॥ १ ॥

मामा भयें रात्रि शिरीं सुदूर । ज्या जन्मतां वाहुनि पूरपार ॥
दिलें यशोदेप्रति वाढवाया । श्रीकृष्ण ते सर्व हरोत माया ॥ २ ॥

स्वबाल लीलाहि जनांस देतां । आनंद, दैत्यां वधिती समस्तां ॥
कंसें स्वघातास्तव धाडिले जे । त्या कृष्णजींना प्रणिपात माझे ॥ ॥ ३ ॥

खरें जगद्व्यापक रूप रास-। क्रीडेंत जें दावित गोपिकांस ॥
त्यांचा मनींचा पुरवुनि काम । त्या कृष्णजींना शतशः प्रणाम ॥ ४ ॥

विद्या शिकाया बसुनी कुटींत । सामान्य-शिष्यासह विश्वनाथ ॥
गुरूस जे सेवित कष्टुनी ते । श्रीकृष्ण सर्वत्र दिसोत मातें ॥ ५ ॥

बारूनि सर्वां स्ववधोद्यमातें । निमंत्रणें जाउनि उत्सवातें ॥
मल्लेभकंसा[1] वधिती प्रमत्ता । प्रणाम त्या सादर कृष्णनाथा ॥ ६ ॥

निर्लोभ जे कंसवधींहि साच । न राज्य लक्ष्मी "हरतां" स्वतांच
पदच्युता अर्पिति उग्रसेना । प्रणाम त्या सादर कृष्णजींना ॥ ७ ॥

जे प्रेमपत्रास्तव रुक्मिणीला । जातां गृहा वंदुनि अंबिकेला ॥
मोहूनि सैन्यास हरूनि नेती । ते कृष्णजी नित्य वसोत चित्तीं ॥ ८ ॥

लाक्षागृहीं नी वनवासि, पार्थ—। भीष्मप्रतिज्ञासमही अनर्थ ॥
यांतून जे तारिति पांडवांतें । श्रीकृष्ण रक्षोत सदा मला ते ॥ ९ ॥

दुःशासन द्रौपदीला सभेंत । करूं बघे जैं उघडी प्रमत्त ॥
लज्जा तिची घांवुनि रक्षिती ते । श्रीकृष्ण रक्षोत सदैव मातें ॥ १० ॥

स्वराज्य घ्याया लुढुनी तयार । जो ऐन वेळीं परिसोडि धीर ॥
त्या अर्जुना बोधुनि चेतवीती । श्रीकृष्ण ते नित्य वसोत चित्तीं ॥ ११ ॥

भौमासुरातें वधुनी हजार । नारींप्रती सोडवुनी उदार ॥
जे त्या सुदीनां वरिती अनाथां । प्रणाम त्या सादर कृष्णनाथा ॥ १२ ॥

सुबोध[2] अज्ञान-निवारणाला । ज्यांचा पृथक उद्धव अर्जुनाला ॥
कल्याणकारी बहु मानवांतें । श्रीकृष्ण रक्षोत सदा मला ते ॥ १३ ॥

जे शक्ति नी युक्ति नि बुद्धि यांत । नीतींतहि श्रेष्ठ विभू जगांत ॥
परीक्षिती पावतिही स्वभक्तां । प्रणाम त्या श्री-प्रभु-कृष्ण-नाथा ॥ १४ ॥

---

१ मल्ल ( मुष्टिक ); इभ कुवलयापीड हत्ती

२ उद्धवाला—भागवत-स्कन्ध ११ वा. अर्जुनाला—भगवद्गीता

# श्रीकृष्ण चरित्र रहस्य



मानव हा उत्सवप्रिय प्राणी आहे. हें ओळखून आपल्या पूर्वजांनीं आपल्या कल्याणासाठीं रामकृष्णादिक विभूतींच्या जयंत्या व समर्थ तुकोबादि साधुपुरुषांच्या पुण्यतिथ्या साजऱ्या करण्याची रीत घालून दिली. वर्षाच्या बारा महिन्यांत हे उत्सव एका मागून एक येतच असतात. या उत्सवांचा मूळ हेतू त्या त्या थोर पुरुषांच्या गुणविशेषांचें स्मरण व्हावें त्यापैकीं जास्तीत जास्त गुण आत्मसात करण्याची स्फूर्ति व्हावी व आपलें ऐहिक व पारलौकिक कल्याण व्हावें हा होय. पण अलिकडच्या काळांत हा मूळ हेतू बाजूला राहून उत्सवाच्या बाह्यांगाकडेच बहुतेकांचें लक्ष लागलेलें दिसतें. ते उत्सवाच्या मूळ हेतुकडेहि लागावें व आपल्या कल्याणाचा मार्ग डोळ्यासमोर निरंतर राहावा या उद्देशानें भगवंताच्या या पूर्णावताराचें रहस्य वर दुसरीकडे दिलेल्या चवदा श्लोकांत श्री. छत्रे यानीं गुंफण्याचा चांगला प्रयत्न केला आहे. त्याचें स्पष्टीकरण थोडक्यांत त्यानींच पुढीलप्रमाणें केलें आहे.—

**रक्षाया सज्जना तैंवी दंडायास्तव दुर्जना ।**
**घेतों प्रतियुगीं जन्म, स्थापाया धर्म अर्जुना ॥—गीता ४।७**

श्रीकृष्ण चरित्र रहस्य असें हें आपलें ब्रीद भगवंतांनीं आधीं खरें केलें व मगच अर्जुनाला सांगितलें.

**श्लो० १**—तेजस्वी नवजात अर्भक-वधासारखें क्रूर कृत्य पाशवी शक्तीच्या बळावर कोणी दुष्ट करूं पाहील तर त्याच्या कपाळी अपयश व विनाशच येणार.

**श्लो० २**—संकटकालीं मायापाश निष्ठुरपणें तटातट तोडून मातापित्यांनीं पुत्राच्या संरक्षणार्थ त्याला दूर करावें अशा मातृसुखास आंचवलेल्या अर्भकांचें पालन पोषण मातेपेक्षांही कांकणभर अधिक प्रेमानें ती उपमाता करते.

**श्लो० ३**—प्रत्येक गोपीला श्रीकृष्णाचें सहवाससुख आपल्याला जास्तीत जास्त मिळावें अशी उत्कट इच्छा होती. रासक्रीडेच्या मिषानें भगवंतांनीं त्यांची ती इच्छा पुरी केली पण त्याबरोबर मी प्रत्येकीजवळ कसा आहे हें दाखवून त्यांचा ‘श्रीकृष्ण माझ्या एकटीजवळच आहे’ हा अहंकारही दूर केला.

**श्लो० ४**—बालपण गवळ्यांच्या सहवासांत घालवून उच्च नीच भाव न ठेवतां प्रेमाचा मी कसा भुकेला आहे हें भगवंतांनीं सोदाहरणानें दाखविलें. प्रत्येकांत आत्मसंरक्षणाचें सुप्त सामर्थ्य असतें, तें प्रत्येकानें संकटांत उपयोगांत आणलें पाहिजे हें अघासुर, पूतना, बृकासुर वगैरे आपले प्राण घेण्यासाठीं आलेल्या दुष्टांचा नाश करून श्रीकृष्णांनीं दाखविलें. लहान मुलें एकटीं घरीं असतांना चोर शिरले तर आरडा-ओरड करून चोरास पळवून लावल्याच्या अगर कौशल्यानें पकडून दिल्याचें वृत्त आपण कधीं कधीं वाचतों अगर ऐकतों. दुसरा मला मदत करावयाला येईल अगर मला मदत करील याची वाट पहात बसण्याआधीं आपण स्वतःला मदत प्रथम केली पाहिजे :— उद्धरेदात्मनात्मानम्......

**श्लो० ५**—सांदीपनीच्या आश्रमांत विद्याभ्यासासाठीं सामान्य शिष्याप्रमाणें राहून रानांतून डोक्यावर सरपण आणण्यासारखीं हलकीं वाटणारीं कष्टाचीं कामें करून भगवंतांनीं एक उच्च आदर्श आपल्यापुढें ठेवला आहे.

2-39

श्लो० ६—कंसाचा कावा ओळखून क्रीडामहोत्सवाचें निमंत्रण स्वीकारून श्रीकृष्णांनीं बलरामांसह तेथें जाऊन आपल्या नाशाचा त्यानें योजलेला प्रत्येक बेत उलटवून शेवटीं त्यालाही ठार केलें. तोंपर्यंत त्याला सुधारण्याची संधि दिली.

श्लो० ७—कंसाला ठार केल्यावर आपण स्वतः त्याच्या गादीवर न बसतां उग्रसेनाला बसविलें. ज्याचे राज्य त्याला दिलें. श्रीकृष्णाची ही निर्लोभ वृत्ति पाहून इतर राजे चकित झाले.

श्लो० ८—रुक्मिणीच्या प्रणयपत्रिकेचा आदर करून प्रबळ अशा राजमंडळाच्या प्रतिकारास न जुमानतां—प्रत्यक्ष तिच्या भावाचा विरोध कस्पटाप्रमाणें मानून तिचें हरण केलें. वीराचा एक आदर्श येथें दाखविला.

श्लो० ९—पांडवांचे नातें व त्यांचा पक्ष न्यायाचा आहे, या गोष्टी ध्यानांत घेऊन त्यांनीं ठेवलेल्या विश्वासाप्रमाणें त्यांचें संरक्षण सर्वप्रकारें—वेळीं प्रतिज्ञा मोडून—वाईटपणा पत्करूनहि केलें. शुद्ध प्रेमाचें फळ काय मिळतें हे दाखविलें.

श्लो० १०—देवाची भक्ति अखंड करीत राहिलें व संकटप्रसंगीं आर्तस्वरानें त्याला हांक मारली, त्याची करुणा भाकली; तर तो पावल्याशिवाय राहात नाहीं, असें वस्त्रहरणप्रसंगीं द्रौपदीची लाज राखून देवांनीं दाखविलें. 'नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी' हें खरें आहे. अडचण आहे एक 'भक्त' होण्याचीच.

श्लो० ११।१३—कौरवांकडून राज्याचा आपला न्याय्य अर्धा वाटा सामोपचारानें मिळत नाहीं अशी खात्री झाल्यावर पूर्ण विचारान्ती तो युद्धानें मिळविण्यास अर्जुन तयार झाला असतां ऐनवेळी त्याला मोहानें ग्रासलें. तेव्हां भगवंतांनीं त्याला 'गीता' सांगून कर्तव्याला प्रवृत्त केलें व शेवटीं जयही मिळवून दिला. ही पार्थ गीता व उद्धवाला सांगितलेली 'उद्धवगीता' (भागवताचा अकरावा स्कन्ध) या दोन गीता म्हणजे आपणा मानवांना श्रीकृष्णांनीं दिलेला ज्ञानाचा अमोल ठेवा आहे. ते आत्मसात करून मानवानें उद्धरून जावें. जन्म मृत्यूच्या फेऱ्यांतून आपली सुटका करून घ्यावी.

श्लो० १२—नरकासुरानें एक हजार युवती पळवून नेऊन बंदींत टाकल्या होत्या. ही वार्ता व त्यांची आर्त हांक कानीं येतांच त्या असुरास ठार करून त्या युवतींना सोडविलें व त्यांनीं प्रार्थना केली म्हणूनच आसक्तीनें नव्हे त्यांच्याशी विवाह केलें व त्यांना समाजांत मानाचें स्थान प्राप्त करून दिलें. अशा अपहृत स्त्रियांस घरांत घेण्यास त्यांचे नातलग तयार नव्हते. उघडपणें पत्नी म्हणून त्यांचा स्वीकार करावयास पुढें येणारे पुरुष नव्हते. अशा परिस्थितींत त्यांना परित्यक्त अवस्थेत जीवन घालवावें लागून समाजांत भ्रष्टाकार वाढला असता. तसें होऊं नये म्हणून श्रीकृष्णांनीं त्यांचा स्वीकार करण्यांत मोठें धैर्य दाखविलें व एक महत्त्वाचें सामाजिक कर्तव्य पार पाडलें.

श्लो० १४—शक्ति, बुद्धि आणि युक्तींत श्रेष्ठ व थोर मुत्सद्दी, भक्तांची परीक्षा पाहाणारे व कसोटीला उतरल्यावर पावणारे असे भगवान् श्रीकृष्ण आपणां सर्वांस सद्बुद्धि देऊन आपलें सर्वांचें रक्षण करोत.

---

# रामनामाचा महिमा

**भगवान रामकृष्ण परमहंस**

**चातक पक्षाला पावसाच्या पाण्याची तहान लागलेली असते. तो दुसरें पाणी तोंडांत घेणार नाहीं. तहानेनें व्याकूळ झालेला असला तरी तो आपली चोंच वर करून पर्जन्य वर्षावाची वाट पहात राहील. गंगा, यमुना व इतर नद्या दुथडी भरून वहात असल्या तरी त्या पृथ्वीवरील पाण्याला तो पक्षी स्पर्श करणार नाहीं. त्याचें आपलें लक्ष असतें आकाशांतून खालीं कोसळणाऱ्या पाण्याकडे !**

## कावळ्याची धास्ती

एकदां राम आणि लक्ष्मण पंपा सरोवराच्या कांठावरून जात होते. इतक्यांत पाण्यासाठीं आतूर झालेला एक कावळा लक्ष्मणानें पाहिला. तो पुन्हां पुन्हां पाण्याच्या सपाटीजवळ जावयाचा, परंतु चोचेंत पाणी कांहीं घेत नसे. लक्ष्मणास तें दृश्य पाहून मोठें आश्चर्य वाटलें. त्यानें रामाला त्याबद्दल खुलासा विचारला असतां श्रीरामचंद्र म्हणाले, " बंधो ! बरा प्रश्न विचारलास ! अरे, तो कावळा देवाचा परम भक्त आहे. तो रात्रंदिवस–अहोरात्र रामनामाचा जप करीत असतो. तहानेमुळें त्याच्या घशास कोरड पडली आहे. हताश झाला आहे बिचारा, तो पहा ना; पाण्याजवळ येतो परंतु पाण्याला मात्र स्पर्श करीत नाहीं. कारण ? तेवढ्या वेळांत रामनाम घेण्याच्या आपल्या उपक्रमांत व्यत्यय येईल अशी धास्ती वाटते त्याला !'

दुसरी एक घटना. सीतेची खबर घेण्यासाठीं हनुमंताला रामानें लंकेला पाठविलें होतें. त्याप्रमाणें तो जाऊन आला तेव्हां श्रीरामचंद्र त्याला विचारतात, " बरें झालें; सीतेला भेटून तूं आलास. ती कशी काय दिसली तें ऐकण्याची मला उत्कंठा लागून राहिली आहे.'

हनुमान म्हणाला, ' भगवन् ! होय; मी सीतेला पाहून आलों; परंतु काय पाहिलें ! मी अशोक वनांत सीतेचा फक्त देह तेवढा पाहिला. त्या देहांत तिचें मन किंवा तिचा आत्मा मला आढळून आला नाहीं. केवळ शुष्क शरीर मी पाहिलें ! तिचें मन आणि आत्मा आपल्या पायांशीं गुंतून राहिले असावेत. ते त्या शरिरांत नव्हते ! लंकेंत सीतामाईचा देह तेवढा होता. यमराज तेथें आसपास घिरट्या घालीत होते; परंतु तेथें त्याचा तरी काय इलाज चालणार ? शरिराशीं त्याचें कांहींच कर्तव्य नव्हतें.'

## चिंतनाचें महत्त्व

एखाद्या वस्तूवर, व्यक्तीवर किंवा ध्येयावर तुम्हीं रात्रंदिवस चिंतन करूं लागला, त्याचाच निशिदिनीं ध्यास घेतला तर तुम्हीं तद्रुप होऊन जातां. तुम्हांला तुमचें स्वतंत्र अस्तित्वच रहात नाहीं.

तुम्ही रात्रंदिवस देवाचें ध्यान करूं लागला तर तुमच्याठायीं देवत्व आल्याशिवाय रहाणार नाहीं.

एक बाहुली होती. ती मिठाची बनविलेली होती. तिला वाटलें, आपण समुद्राची खोली पहावी मापून! घेतली उडी पाण्यांत; आणि झालें काय? पाण्याशीं एकरूप होऊन गेली!

धर्मग्रंथ कशासाठीं जन्माला येतात? त्यांचें ध्येय कोणतें? भगवंताच्या प्राप्तीचा मार्ग दाखवून देणें हेच त्यांचें ध्येय.

एका साधूजवळ एक ग्रंथ होता. तो एका माणसानें उघडून पाहिला तेव्हां त्यांत त्याला काय आढळून आलें? प्रत्येक पानावर 'राम' 'राम' हीं अक्षरें लिहिलेलीं होतीं. त्याशिवाय दुसरें कांहीं एक नव्हतें.

आपलें देवावर खरेंखुरें प्रेम पाहिजे. मग त्याच्यावर लहानमोठा कोणताहि प्रसंग येवो. तें दिव्यत्व त्याच्या मदतीला धांवून गेलेंच पाहिजे. रामनामांत फार मोठी शक्ति भरलेली आहे. किती ती शब्दांनीं व्यक्त करतां येणार नाहीं.

आकाशांत ढग पहातांच मोराच्या भावना उचंबळून येतात. तो सैरावैरा नाचूं बागडूं लागतो. आनंदानें आपला सुंदर पिसारा पसरून तो नृत्य करूं लागतो.

राधेचेंही तसेंच होत असे. मेघावडंबरांत तिला श्रीकृष्ण दिसत असे. घननीळाची आठवण होऊन ती बेभान होऊन जात असे.

चैतन्य प्रभू एका खेडेगावांतून जात होते. त्या भागांतील मातीपासून घुमटें (वाद्यें) तयार करतात. असें समजतांच त्यांचे अंतःकरण भक्तिभावानें भरून आलें. कारण त्या वाद्यांचा उपयोग कथाकीर्तनप्रसंगी केला जात असतो.

अशा प्रकारची अध्यात्मिक जागृति क्वचित्‌च आढळून येत असते. ती कोणाच्या वांट्याला येत असते माहीत आहे? ऐहिक सुखासंबंधीच्या सर्व प्रकारच्या लालसांचा ज्यानें त्याग केला आहे, त्याच्याच वाट्याला हें अध्यामिक सुख येत असतें, इतरांच्या नाहीं.

तुमच्या ठिकाणीं लोभाला, इच्छेला जरासुद्धां अवसर मिळतां कामा नये. त्यांच्याशीं पूर्णपणें ताटातूट झाली पाहिजे. मग तुमच्या दैवी भावना त्यांना उराशी संधी मिळतांच उचंबळून येतील.

आगपेटींतील काड्या ओल्या झालेल्या असल्या तर तुम्हीं कितीही काड्या ओढून पाहिल्या तरी त्या पेट घेणार नाहींत; परंतु त्या जर का सुक्या असल्या तर जरा जरी धक्का लागला तरी त्या पेट घेतलि.

या शरिराला सुखाच्या आणि दुःखाच्या भावना व्हावयाच्याच; परंतु ज्याला ईश्वरी साक्षात्कार झाला आहे; त्याला सुख आणि दुःख दोन्हीं सारखीच. त्याला सुखाची किंवा दुःखाची पर्वाच वाटत नाहीं.

# देव भावाचा भुकेला

***********************

## श्रद्धाच तारक आहे

श्रद्धा व भक्ति हवी–श्रद्धेची शक्ति केवढी ! एक जणाला लंकेहून समुद्र ओलांडून परतीरावर जायचें होतें. बिभीषण त्याला म्हणाला, 'ही वस्तू तूं आपल्या धोतराच्या पदरांत बांधून घे. त्या योगानें निर्विघ्नपणें पार निघून जाशील, पाण्यावरून चालत चालत जाऊं शकशील. पण एक अट. ती उघडून मात्र बघायची नाहीं. नाहीं तर लागलीच समुद्राच्या तळाशींच गांठ !' तो माणूस समुद्रावरून छान निघून जात होता. विश्वासाचा किती प्रभाव बघा. थोडेसे अंतर चालून गेल्यावर तो मनांशीं विचार करूं लागला–बिभिषणानें अशी काय बरें जिन्नस बांधून दिली असेल, कीं जिच्या योगें हा मी पाण्यावरूनही चालत जाऊं शकतों आहे.' असें म्हणून पदराची गांठ सोडून पाहतों तों काय–फक्त 'राम' नाम लिहिलेलें एक पान त्यांत. तो आपल्याशींच म्हणूं लागला हात्तेरे, हेंच ना ? जसा हा विचार आला, बस स्वारी तशीच समुद्राच्या तळाशीं !

म्हणतात ना कीं, मारुतीचा रामनामावर इतका विश्वास कीं, त्याच्या जोरावर त्यानें उडीसारखा समुद्र ओलांडला. पण स्वतः रामाला मात्र सेतूचा खटाटोप करणें भाग पडलें !

ईश्वरावर विश्वास असेल तर हातून पातक घडो कीं महत्पातक घडो; कशाचें भय नाहीं !

× × ×

## गुरुरूपी भगवान

एक वाघीण एकदा एका मेंढ्यांच्या कळपावर चालून गेली. एका शिकाऱ्यानें दुरूनच सारा प्रकार बघून तिला मारून टाकलें. वाघीण गाभण होती. मरतां मरतां तिनें एका पिलाला जन्म दिला.

तें पिलूं मेंढ्यांच्या कळपांत वाढूं लागलें. प्रथम प्रथम मेंढ्यांचें दूध पिई. थोडें मोठें होतांच त्यानें गवत खायला सुरवात केली. मेंढ्यांप्रमाणें बें बें देखील तें करी. त्या लहानशा पिलाचा एक थोरला वाघ बनला, तरी पण त्याचें तें गवत चरणें व बें बें करणें गेलें नाहीं. कुणा श्वापदानें आक्रमण करतांच मेंढ्यांप्रमाणें जीव मुठींत घेऊन तें पळत सुटे.

होतां होतां एके दिवशीं एका भयंकर वाघानें त्याच कळपावर हल्ला केला. तिथें अजापुत्रांच्या कळपांत आपल्यासारखाच एक वाघ गवत खात असलेला पाहून त्याला आश्चर्याचा जबरदस्त धक्काच बसला ! वाघोबाला पाहतांच त्या मेषपात्रानें धूम ठोकली. तेव्हां त्या शेळ्यांचा पिच्छा सोडून वाघानें त्या गवत खाऊला पकडलें. पण तें शेळपट बें बें

करत पळत जाण्याचा प्रयत्न करूं लागलें. त्यावर त्या जंगली वाघानें त्याला पाण्याशीं फरफटत आणलें. आणि म्हटलें, ' हं, बघ या पाण्यांत आपलें थोबाड बघ, माझ्या सारखा एवढ्या जबड्यासारखा तुझाही पण आहे.' नंतर त्यानें त्याच्या तोंडांत थोडें मांस कोंबून दिलें. पहिल्यांदा तो तें कांहीं केल्या खाईच ना–पण नंतर मग थोडी चव घेतांच मिटक्या मारत तो तें खाऊं लागला. त्यावर तो जंगली वाघ म्हणतो, " तूं त्या मेंढ्याबरोबर राहून त्यांच्यासारखा गवत खात होतास अं ! थूः तुझ्या जिनगीवर " या कानउघाडणीनें त्याला स्वतःचीच लाज वाटूं लागली.

गवत खाणें म्हणजे कामिनी कांचनांत घुटमळणें. मेंढीसारखें बें बें करत पळणें म्हणजे साधारण जीवाप्रमाणें आचरण करणें. वाघाबरोबर चालणें म्हणजे चैतन्यदाता गुरूला शरण जाऊन त्याचा आश्रय घेणें–त्यालाच आपलें समजणें. आपला खरा चेहरा बघणें म्हणजेच स्वस्वरूप ओळखणें.

× × × ×

"मी" (अहं)

एके दिवशीं श्री रामकृष्ण म्हणतात–विज्ञानी हा भक्तीच्या आसऱ्यानें कां राहत असतो आहे ठाऊक ? "मी" जात नाहीं एवढ्यासाठीं समाधी अवस्थेंत असतांना जातो खरा, पण पुन्हां येऊन हजर होतो. अन् साधारण जिवांचा अहंकार तर कधींच जात नाहीं. पिंपळाचें झाड सफा तोडून फेका, उद्यां पुन्हा जाऊन पहा. अंकुर तयार.

ज्ञान लाभानंतर देखील कुणास ठाऊक कसा, पण 'अहं' आपला कुठून तरी येऊन दत्त म्हणून उभा राहतो ! स्वप्नांत वाघोबा पाहिला, त्यानंतर झोंप उघडून जागे झालांत तरी छातींत धडधड चालूंच ! या 'मी' मुळेंच तर जीवाच्या कपाळीं साऱ्या दुनियेचें दुःख अन् यातना. बैल 'हम्मा' (मी) 'हम्मा' (मी) करतो म्हणून तर इतक्या हाल–अपेष्टा. नांगराला जुंपतात. उन पाऊस तर अंगावरून जातात. त्यांची गणतीच नाहीं, आणि शेवटीं कसाई कत्तल करतात. चामड्यापासून जोडे करतात. ढोल तयार होतात–खूप बडवतात लोक ! इतक्यानेंच संपले म्हणतां कां ! सरते शेवटीं आंतड्यापासून तांन तयार होते. पिंजारी ती आपल्या धनुकलीला लावून धुजकतात. तेव्हां मात्र आणखी 'मी' म्हणत नाहीं. मग 'तुं ऊं' 'तुं ऊं' (तुम्ही तुम्ही) जेव्हां 'तुम्हीं' 'तुम्हीं' म्हणतो तेव्हांच कुठें सुटका. हे प्रभो, मी चाकर, तुम्ही मालक. मी मुलगा, तुम्ही आई !

× × ×

रामानें विचारलें, हनुमंता, तूं माझ्याकडे कोणत्या दृष्टीनें बघत असतोस ? हनुमान म्हणाला.' रामा, ज्यावेळीं माझ्या चित्तांत 'मी' पणाचा बोध असतो त्यावेळीं मला दिसून येतें कीं, तुम्ही पूर्ण मी अंश. तुम्ही प्रभु मी दास. आणि रामा, जेव्हां तत्त्वज्ञान होतें तेव्हां उमजतें कीं तुम्हीच मी आणि मीच तुम्ही.

सेव्य सेवक भावच छान. ' मी ' तर जायचा नाहीं. मग राहो ' दास मी ' होऊन!

**' मी व माझें '** मी आणि माझें ही दोन्हीं अज्ञानें. ' माझें घर, ' ' माझी धन दौलत ' ' माझी विद्या ' ' माझें हें इतकें ऐश्वर्य ' या साऱ्या भावना अज्ञानांतूनच उद्भवतात. ' ईश्वरा, कर्ता तूच, अन् या सर्व गोष्टी—घरदार, कुटुंब परिवार, मुलेंबाळें, नोकर चाकर, मित्रमंडळी या सर्व तुझ्या वस्तु '—या भावनेचा जन्म ज्ञानांतून.

मरण नेहमीं डोळ्यांसमोर वागविणें उचित. मृत्युवर देखील मात करील अशी कोणतीच गोष्ट नाहीं. मरणानंतर कांहींच राहणार नाहीं. इथें येणें म्हणजे फक्त कांहीं थोडें फार काम करण्यासाठीं. जसें घरदार खेडेगांवीं, कलकत्त्याला येणें कामकाजासाठीं. बड्या माणसाच्या बगीचाची देखरेख करणारा इसम, कुणी बगीचा पाहायला आला तर म्हणतो, ' हा आमचा बगीचा ' ही पुष्करणी आमचीच. ' पण कांहीं कसूर होतांच मालक ज्यावेळीं कामावरून बडतर्फ करतो, त्यावेळीं आंब्याच्या लाकडाची एखादी आपलीच पेटी न्यायची उजागिरी नसते बापड्याला. रखवालदाराच्या करवीं चोरून मारून लावून देतो.

दो प्रसंगीं भगवंताला हसल्याखेरीज राहवत नाहीं. वैद्यबुवा जेव्हां रोग्याच्या आईला म्हणतात कीं, ' आई तुम्ही अगदीं भिऊं नका. मी तुमच्या पोराला नक्की नक्की बरा करून देतों.' तेव्हां एकदां भगवान हंसतात. मी मारतोंय् आणि बेटा हा म्हणतो कीं मी याला वाचवीन! वैद्यबोवा आपल्याच तारेंत. त्यांचा अभिप्राय मीच कर्ता. वास्तविक म्हणजे ईश्वरच कर्ता हें बुवांच्या गांवींहि नसतें.

त्याचप्रमाणें ज्यावेळीं दोघे भाऊ दोरी धरून जमीनीचे वाटे करतात नि म्हणतात, ' हं, हा इकडचा माझा अन् त्या तिकडचा तुझा बरें ' त्यावेळीं आणखी एकवार भगवान् हंसतात. अशा विचारानें कीं, हें जगत् ब्रह्मांड माझें, अन् हे म्हणत आहेत, ही जागा ' माझी ' नि ती तिथली ' तुझी ! ' '

तर्कत्व बनून कां त्याला कुणी जाणलंय् ? त्याचा दास बनून शरणांगत होऊन त्याला आळवा.

पांडित्यपूर्वक तर्क चालवून त्याला जवळ जाणतां यायचें नाहीं.

× × ×

## भीष्मनिर्वाण

उत्तरायण लागूं पाहत होतें. एके सकाळीं युधिष्ठिरानें श्रीकृष्णाच्या प्रासादांत एक दूत पाठविला. थोड्यांच वेळांत परत येऊन तो नम्रपणानें म्हणाला, ' प्रभु ध्यानस्थ बसले आहेत.'

युधिष्ठिराला अतिशय आश्चर्य वाटलें. दोन घटकांनीं तो श्रीकृष्णाच्या प्रासादांत येऊन परम श्रद्धेनें भगवंतास बोलला—

' श्रीकृष्णा, एक शंका विचारूं का ? '

'आनंदानें विचार!'

'तूं सकाळीं कोणाचें ध्यान करीत होतास?'

श्रीकृष्णानें हंसून उत्तर दिलें,

'युधिष्ठिरा, उत्तरायण लागूं पाहत आहे. पितामह भीष्म शरपंजरीं पहुडले असून त्यांची महानिर्वाणाची वेळ जवळ आली आहे. आतांपर्यंत त्यांनीं तुम्हांला विस्तारपूर्वक राजधर्म सांगितला. आपल्याला होत असलेल्या असह्य यातना ते जणूं विसरून गेले होते. आतां ते माझें ध्यान करीत आहेत. त्यामुळें साहजिकच माझें चित्त त्यांच्या ठिकाणीं गुंतलें आहे!'

त्या दिवशीं धर्म भीमार्जुनासह रणक्षेत्रावरील शरशय्येवर शांतपणें मृत्युघटकेची वाट पहात बसलेल्या भीष्मांना भेटायला गेला. बरोबर प्रभु श्रीकृष्णही होता. त्याला पहातांच भीष्मांना परम संतोष झाला. अतिशय आनंदानें ते म्हणाले,

'ये श्रीहरी ये, मला भेट दिलीस!'

त्यांच्या नेत्रांतून खळखळां आंसवें वाहूं लागलीं. सद्गदित स्वरांत ते बोलले.

'श्रीकृष्णा, भगवंता! अरे, योगी लोक अंतकाळीं तुझें स्मरण व्हावें म्हणून कोण क्लेश भोगतात. केवढ्या असह्य मानसिक यातनांना ते तोंड देतात. पण मी बघ केवढा भाग्यवान! यापैकीं कांहींच न करितां मृत्युसमयीं तूं माझ्याजवळ आहेत. उत्तरायण लागूं पाहत आहे. सगळे शुभ योग एकत्र झाले आहेत. या सर्व शुभ योगांचा मुगुटमणि असा तूं आपण होऊन माझ्या भेटीला आला आहेस! तेव्हां तुझी अनुज्ञा असेल तर मी हे प्राण तुझ्या विश्वरूपांत मिळवीन म्हणतों.'

श्रीकृष्ण त्यांचेजवळ उभा राहिला. त्यांच्या मस्तकांवर हात ठेवीत त्यानें विचारले,

'राजर्षि, मन स्थिर आहे ना?'

'श्रीहरि, तें तर सतत तुझ्याकडे लागलें आहे!'

'तर मग आतां निघावें.'

श्रीकृष्णाकडे पहात पहात राजर्षि भीष्मांनीं अत्यंत शांतपणें तनुत्याग केला. काय तो भाग्याचा सुखसोहळा!

———



# श्रीसाईसच्चरित – गद्यानुवाद

ले० : एक साईभक्त



अध्याय १० वा (पुढें चालू)

लौकिक विद्या शिकविणारे अनेक गुरू असतात, परंतु हा भवसागर पार तरून जाण्याचें मार्गदर्शन करून जो आत्मस्वरूपाची ओळख करून देतो तोच सद्गुरु जाणावा. त्याचा महिमा कळणेंच कठीण. साईंच्या दर्शनासाठीं जे जे जात असत, त्यांनीं कांहीं एक विचारण्याच्या अगोदर साईच सर्व खाणाखुणासहित त्यांचें भूत भविष्य आणि वर्तमान निवेदन करीत. साईंचा सर्व भूत मात्रांच्या ठिकाणीं ब्रह्मी भाव असून सर्वांकडे ते सारख्या दृष्टीने पहात. शत्रु आणि मित्र हा जरासुद्धां भेद त्यांच्याकडे नव्हता. ते निरपेक्ष आणि समदर्शी असून अपकार कर्त्यांवर अमृताचा वर्षाव करीत. ते समचित असून उत्कर्ष वा अपकर्ष या विकल्पाचा त्यांना कधींहि स्पर्श होत नसे. मानव देहधारी ते असले तरी या देहावर त्यांनीं प्रेम केलें नाहीं पण अंतरीं ते विदेही आणि निर्मुक्त असे होते.

धन्य, धन्य ते शिरडीग्रामवासी ! साई ज्यांची देवता असून आसनीं शयनीं भोजनीं ते अखंड साई चिंतन करीत असतात. धन्य त्यांचा तो प्रेमा ! खळ्यांत, परसांत कामें करितांना किंवा दळतांना कांडतांना, डेरे घुसळतांना सारखे ते साईगुणगान करीत असतात. सदासर्वदा बाबांचें नामस्मरण. दुसरा देव त्यांना नव्हताच. निर्मळ आणि गोड प्रेमानें शिरडींतील बाया बाबांची गाणीं गात. त्या गाण्यांत इतकी मधुरता असे कीं विद्वत्त्वपूर्ण कवीहि अशी गाणीं करूं शकणार नाहीं. साधी सरळभाषा. तिळभर विद्या नाहीं, पण त्या कवनांत कवित्वाची अशी चमक असे कीं ती पाहून चतुरज्ञाते सुद्धां मान डोलवीत. ज्या योगें खऱ्या प्रेमाचें दर्शन होतें तेंच खरें कवन आणि अशी कवनें या बायांच्या वाणींतून ऐकावीत. साईबाबांची इच्छा असल्यास पूर्ण संग्रह लाभून अशा कवनांचा एक अध्याय होईल आणि श्रोत्यांची श्रवणेच्छा पूर्ण होईल. भक्त कृपेमुळें निराकार असें जें मूळ रूप तें साईरूपानें शिरडींत प्रगटलें. करितां देहाहंकारादि विकारांचा त्याग करून भक्तिस्वरूपानें त्यांना ओळखा. जणूं काय भक्ताचें पुण्य कळून प्राप्त काल होतांच साईरूपानें पूर्ण अंकुरलें आणि शिरडींत फळास आलें. अनिर्वाच्य होतें त्याला वाचा फुटली. अजन्म्य होतें त्यास जन्म प्राप्त झाला. अमूर्त

होतें तें करूणरसाची ओतीव मूर्ति झालें. यशवंत, श्रीमंत, वैराग्यशाली, ज्ञानवंत ऐश्वर्य आणि औदार्यमंडित अशी ही षड्गुणान्वित साईंची मूर्ति.

साईबाबांचा निग्रह पण विलक्षणच. स्वतःसाठीं त्यांनीं केव्हांही परिग्रह केला नाहीं, पण भक्तानुग्रह करण्यासाठीं अमूर्त असा विग्रह ते धरित. त्यांचा कृपाभाव तर किती ! कोण देव सांपडला आहे याचा त्याला ठाव लागण्यापूर्वींच ते भक्तांचा भाव आपल्याकडे जडवून घेत. वाग्देवताही जे बोलूं शकणार नाहीं किंवा श्रवणदेवताही जें ऐकतां लज्जेनें मान खालीं घालील असे बोल महाराजांनीं भक्तांच्या कल्याणासाठीं नेहमी वदावे. ज्यांच्या बोलांचा अनुवाद करण्यापेक्षां मुकें राहणेंच बरें, परंतु कर्तव्यच्युत न व्हावें म्हणून असें बोलणें प्राप्त झालें. भक्तऋणव असे बाबा त्यांची लीनता पहा. ते अतिशय लीन होऊन म्हणतात; मी तुमचा ऋणी आहे. दासानुदास आहे म्हणून तुमच्या दर्शनासाठीं निघालों ही तुमचीच कृपा म्हणून तुमच्या पायांची भेटी झाली. ‘ किडा मी तुमचे विष्टे पोटीं । धन्य ही सृष्टी तेणेनी ॥ काय ही नम्रपणाची चित्ताला हौस. निरभिमानता आणि शालीनताही त्यांची तशीच. हे बाबांचे उद्गार खरे आहेत म्हणून मी सादर केले. कोणास वाटेल कीं मी त्यांचा अनादर करीत आहें तर त्यांनीं मला क्षमा करावी. वाचेला विटाळ झाला असेल किंवा श्रवणाचें पाप टाळायचें असेल तर आपण साईनामाचें आवर्तन करूं या म्हणजे सगळे दोष नाहींसे होतील. आमच्या जन्मोजन्मींच्या तपश्चर्येचें साईकृपा हेंच फळ असून तृषार्ताला जसें जल तसेंच तें आम्हांस सुखदाई आहे.

रसनेची रसस्फूर्ति नसल्यामुळें जीव्हालोलुप नव्हते. विषयस्फूर्तींचा अभाव होता. विषय त्यांच्या थाऱ्याला उभेच राहत नसत. मग ते विषयांत गुंतणार कसे ? नयनांच्या द्वारें सर्व पदार्थांचें ते अवलोकन करीत. परंतु पुढें येणारें पदार्थ अवलोकिले आहेत याची जाणीवच होत नसे. अवलोकन स्फूर्तीच नव्हती. हनुमंताचे भुःभुःकारानें गर्भ राहिला तर तो मातेस दिसत असें किंवा श्रीरामास माहीत अशा त्या हनुमंताच्या ब्रह्मचर्याची तुलना कोणास करवेल का ? जेथें मातेला लिंगावलोकन नसे तेथें इतरांची काय कथा ! बाबांचेही ब्रह्मचर्य असेंच. परम कठीण परिपूर्ण आणि अपूर्व होतें. कासे सदा कौपिन कसलेली असे. लिंगाचा उपयोग फक्त मूत्र विसर्जनासाठीं, अवयवां पोटीं एक अवयव एवढेंच. अशी ही बाबांची देहस्थिति ! त्यांची इंद्रियें कर्मप्रवृत्त असली तरी त्यांत विषयस्फूर्ति मुळींच नव्हती. सत्व, रज, तमादि गुणासहीत सर्व इंद्रियें ठाण्यावर खिळली असून लौकिकी कर्तेपणा दाखवीत पण प्रत्यक्षांत कोणासहि आकलन करतां येत नव्हतें. बाबा निःसंग, निष्काम आणि परिपूर्ण होत.

विषयही त्यांना ब्रह्मसम होते. पापपुण्याच्या पलीकडचे ते असून पूर्ण निवृत्तिस्थान होते ते. अशी त्यांची मुक्तस्थिति होती. त्यांच्या अंगीं देहाभिमानता नसून विषमतेनेंहि त्यांना स्वप्नांत कधीं स्पर्श केला नाहीं. म्हणूनच नानावल्लीनें ऊठ म्हणतांच गादी सोडून ते बाजूला झाले. इहलोकीं त्यांना कांहीं प्राप्तव्य नव्हतें. तसेंच परलोकांत कांही साध्य करायचें नव्हतें. केवळ लोकांवर अनुग्रह करण्यासाठीं ते संत या महीवर अवतरले होते. परावर

कृपा करण्याशिवाय अवतार घेण्याचें संतांस दुसरें प्रयोजन नसतें. असे हे संत करुणाघन कृपाळू असून परहितासाठीं येतात. त्यांचें हृदय लोण्यापेक्षांहि मऊ असून दुसऱ्यास होणाऱ्या तापानें त्यांचें अंतःकरण द्रवत असतें. अंगांत घालावयास ठिगळ्यांची कफनी आणि बसावयास तरटाचें आसन असून त्यांचें मन वृत्तिशून्य असे. मग रौप्यसिंहासनाची त्यांच्यापुढें काय्रे मातब्बरी! भक्तांच्या भावाकडे पाहून त्यांचीं दुःखें हरण करून त्यांना आपल्या पाठीशीं घालीत. बाबा शिरडी सरोवरांतलें कमलपुष्प असून भक्त त्यांचा सुवास उपभोगीत आहेत पण अभागी मात्र सर्व काळ चिखल तुडवीत राहत आहेत. बाबा कोणास आसन देत नाहींत. प्राणायाम वा इंद्रिय दमनही कोणास सांगत नाहींत, ना देती कोणाला मंत्र-तंत्र वा यंत्र-भजन किंवा कान फुंकणेंही नसे. व्यावहारिक दृष्ट्या ते आचरण करीत, परंतु अंतरी निराळेच. व्यवहारांत अत्यंत दक्ष असून त्यांची कोणी बरोबरी करूं शकणार नाहीं. भक्त कल्याणार्थ हा देह धारण केल्यामुळें तसेंच त्यांचे विकार आणि लौकिक विचार असतात हें सर्वांनीं जाणावें. संतनिधान साईमहाराज केवळ शुद्ध परमानंदाचें स्थान असून निरभिमानी आणि निर्लेप आहेत. त्यांना माझे साष्टांग दंडवत असोत. महाराज ज्या ठिकाणीं चालून आले तें फार पवित्र स्थळ असलें पाहिजे. संचिताच्या गांठी पूर्ण झाल्या होत्या. या शिवाय असें निधान दुर्लभ असतें. शुद बीजा पोटी रसाळ गोमटीं फळें येतात याचा अनुभव शिरडीकरांनीं घेतला. ते हिंदु नव्हते, यवनही नव्हते. त्यांना आश्रम ना वर्ण परंतु भवाचें निःसतान समूळ करीत. गगनाच्या भव्यतेप्रमाणेंच बाबांचें चरित्रही गहन आणि विशाल आहे. त्याचें यथार्थ आकलन कोण बरें करूं शकणार? चित्ताचें काम चिंतन करणें हें आहे. एक क्षणही चिंतना शिवाय जात नाहीं. विषयीं विषयचिंतन करतो. पण ज्याला गुरुलाभ होतो तो गुरुचिंतनांतच निमग्न असतो. करितां आतां सर्व इंद्रियांचें काम करून जें गुरु महिमन् ऐकलेंत तें सहजाचि साईस्मरण, भजन आणि कीर्तन होय.

पंचाग्निसाधन, यज्ञ, याग, मंत्र तंत्र, अष्टांग योग हे सर्व प्रयोग ब्राह्मणांस शक्य आहेत. इतरांना त्याचा उपयोग नसतो तसें संतकथांचे नाहीं. त्या सर्वांना सन्मार्ग दाखवितात, भवव्याधी हरण करून परमार्थ प्राप्ति करून देतात. संत कथांचें नित्य श्रवण मनन परिशीलन व निदिध्यास केल्यास द्विज, शुद्र वा स्त्री-पुरुष सर्व पावन होतात. ज्याच्या ठिकाणीं प्रेम वा आसक्ति नाहीं असा एकही मनुष्य प्राणी आढळणें अशक्य आहे. प्रत्येकाचें कांहींतरी एक प्रेमाचें स्थान असतें. कोणी मुलांबाळांवर प्रेम करतात तर कोणाचें धन मान संपत्तिही प्रेमाचीं स्थानें असतात तर कुणी देहावर, घरावर प्रेम करतात तर कांहीं लौकिक किर्ती व विद्या प्राप्तिसाठीं आसक्त होतात. ज्याज्या विषयाविषयीं प्रेम वाटतें तें एकवटून हरिचरणमुशींत आटलें जातें आणि भक्तिरूपानें प्रगटतें म्हणून देहानें प्रपंचकरा पण चित्त साईचरणीं समर्पा म्हणजे कृपा होईल. हाच एक सोपा उपाय आहे. या अल्प साधनांनीं महत लाभ घडणार आहे. मग हें श्रेय संपादन करण्यास श्रोते हो औदासिन्य कां दाखवितां! अल्पसायासानें

हा मोठा फायदा होणार आहे तरी बहुजन या उपायाचा अनादर कां करितात अशी एक शंका कदाचित् तुमच्या मनांत येईल. याला कारण एकच आहे. भगवत् कृपेशिवाय अशी लालसा उत्पन्न होणें शक्य नसते. भगवंत प्रसन्न होतो त्याचवेळीं श्रवणलालसा प्रकटते. तेव्हां साईंना शरण जा. नारायणाची तुमच्यावर कृपा होईल. श्रवणेच्छेचें जनन होऊन हें स्वल्पसाधन तुम्हांस प्राप्त होईल.

गुरुकथेची सत्संगति घरल्यास संसार गुंतींतून तुम्ही पार व्हाल. यांतच आपले सार्थक आहे हें जाणून कोणताही विकल्प तुम्ही मनांत आणूं नका. सर्व चतुराई सोडून निरंतर साई स्मरण केल्यास 'बेडा पार' होईल याविषयीं संदेह मुळींच बाळगूं नका. मी हें माझ्या मनींचे सांगत नसून साई मुखींचें सखोल बोल आहेत. हे खोटें मानूं नका, तसेंच त्यांचे तोलही करू नका. कुसंग हा सर्वबाजूनीं खोटा असून महादुःखदायी आहे व सर्व सौख्याला फांटा देणारा आहे. एकट्या साईनाथावाचून व सद्‌गुरुवीण या कुसंगाचें कुणीच परिमार्जन करूं शकणार नाहीं. गुरुमुखांतून कळवळ्यानें जीं वचनें निघालीं आहेत त्यांचें भक्त हो नीट जतन करा म्हणजे आपोआपच कुसंगाचें निरसन होईल. सृष्टीसौंदर्य लोलुप मन त्यांत रमतें पण तीच दृष्टी मागें परतली म्हणजे सत्संगांत रत होते. सत्संग देहाभिमानाचें समूळ निर्दळण करतो इतकी त्याची महति आहे. म्हणूनच सत्संगासारखें दुसरें साधनच नाहीं. नेहमीं सत्संग करावा. इतर संग दोषयुक्त आहेत. सत्संग निर्व्यंग असून प्रत्येक अंगांत निर्मळ असा आहे. सत्संगाची एवढी बलवत्तर शक्ति आहे कीं तो देहासक्ति तोडून टाकतो आणि एकदां त्याच्या ठिकाणीं भक्ती जडली म्हणजे संसारनिर्मुक्ति झालीच म्हणून समजावें. भाग्यवशात् सत्संगाचा लाभ झाल्यावर कुसंग पळ काढतो आणि आपलें मन निःसंग होऊन तेथेंच रमतें. परमार्थी रिघाव व्हावयाचा असेल आणि विषयविरक्तिसाठीं सत्संगाची हाव न घरल्यास स्वस्वरूपाचा ठाव केव्हांच लागावयाचा नाहीं. सुखामागें दुःख येतें आणि दुःखामागें सुख ही जगराहटी आहे. माणूस सुखाशी सदा सन्मुख पण दुःखासि मात्र विन्मुख असतो. तुम्ही सन्मुख वा विन्मुख असा. होणारें तें होणारच; पण या सगळ्या भोगांचा मोचक सत्संग आहे. सत्संगामुळें देहाभिमान सुटून जन्ममरणाच्या गांठीं तुटतात. चैतन्यघनाची तात्काल भेट होते. उत्तम गति प्राप्त होण्यास एक संत संगतीच कारण आहे. संतांना अनन्य शरण गेल्यास महाशांतीचें आंदण लाभतें. ज्यांना नाहीं नाम, नमन, भाव किंवा भजन त्यांना आपल्यांत तल्लीन करण्यास संतमहाजन अवतरतात. गंगा, भागीरथी, गोदावरी, कृष्णा, वेण्या, कावेरी, नर्मदा या सर्व नद्या संतपदांची वांच्छा करून येथें स्नानार्थ येतात. त्या स्वतः जगाच्या पातकांचें क्षालन करीत असतात; परंतु संतप्राप्तिविना त्यांच्या पातकांची निवृत्ति होत नसते. जन्मोजन्मींचें भाग्य उदयास आलें म्हणूनच साईंचे चरण लाभले आहेत. त्यायोगें जन्ममरण ठायींच राहिलें असून सर्व भवभयांचें हरण झालें आहे.

आतां संत श्रोते जनहो जें ऐकलें त्याचें मनन करून विश्रांति घेऊं या. पुढचें निरुपण पुढें पाहूं.

हेमाड साईस शरण असून तो साईपदींची वहाण आहे. तो असेंच साईकथानिरूपण करीत राहील आणि त्यायोगें सुखसंपन्न होईल.

किती सुंदर आणि मनोहर तें ध्यान मशीदीच्या कडेवर राहून भक्तकल्याणाच्या हेतूनें एकेकाला उदी प्रदान करीत आहेत.

संसार मिथ्या ! असे जे जाणत असून ब्रह्मानंदी अखंड लीन आहेत व ज्यांचे मन सदैव सुप्रसन्न आहे, त्यांना माझे साष्टांग नमस्कार.

पुढील अध्याय याहूनही बरा आहे. तो ऐकतांच हृदय पुनीत होऊन मनींचें सर्व मल नाहींसें होतील.

अशा रीतीनें श्रीसंतजनांनीं प्रेरित केलेले आणि हेमाड पंतांनीं रचलेल्या श्रीसाई-समर्थ सच्चरिताचा श्रीसाईसमर्थ महिमान नामें दहावा अध्याय संपूर्ण झाला.

॥ श्रीसद्‌गुरुसाई नाथार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥

---



MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to You—A Satisfaction to Us

Chemical Cleaners, Super Fine Darners

Master Dyers

*FOR*

Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार

माटुंगा क्लीनिंग वर्क्स

स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ ( मालक : एस्. व्ही. प्रधान

# श्रीकृष्णभक्त रमावल्लभदास

हृदयें वचनेंहि रमावल्लभदासासि नत असो देहें ।
प्रभुसि म्हणेल स्वपदीं दीनांचें चित्त रत असो देहें ॥

—मोरोपंत

**रमावल्लभदासांची पूर्वपुण्याई फार मोठी होती. त्यामुळेंच त्यांच्या संसारी जीवनांत एकाएकीं क्रांति घडून येऊन त्यांचें लक्ष कृष्णभक्तीकडे वळलें. देवकृपेनें योग्य वेळी सद्‌गुरु भेटून त्यांचें जीवन उजाळलें व त्यामुळें त्यांच्याबरोबर अनेकांच्या जीवनांत क्रांति घडून आली.**

रमावल्लभदास सोळाव्या शतकांत होऊन गेले. त्यांचे वडील देवगिरीच्या मुसलमान राजाच्या अंबरखान प्रधानाचे कारभारी होते. रमावल्लभदासांचे पाळण्यांतलें नांव तुकोपंत होतें. सातव्या वर्षी व्रतबंध होऊन बाराव्या वर्षी विवाह झाला. वयाच्या अठराव्या वर्षी तुकोपंत कारभारी झाले. एकदां शत्रुसैन्याचा पराभव केला असतां त्यांना लुटींत द्रव्य न लाभतां कर्मधर्म संयोगानें नाथ भागवताची पोथी सांपडली. तो ग्रंथ हातीं पडतांच त्यांस मोठा विस्मय वाटला. घरीं आल्यावर त्यांनीं तीं पोथी देवाच्या पुढें ठेविली व साष्टांग नमस्कार घातला. वडिलांनीं लुटींत काय सांपडलें असें विचारलें असतां

" तंव दास म्हणती श्री भागवत । आम्हां सांपडलें जी निश्चित ।
भाग्य आमुचें परमद्भुत । श्री भगवंतें कृपा केली ॥ "

अंबाजी पंतांना मुलांस लुटींत द्रव्य मिळालें नाहीं म्हणून निराश वाटलें.

### भगवताचें पारायण

पुढें तुकोपंतांनीं भागवताचें मोठ्या भक्तिभावानें पारायण सुरूं केलें. ते ती पोथीसारखे तासचे तास वाचीत बसत. पोथीच्या सतत निष्ठापूर्वक वाचनामुळें त्यांच्यांत इतका बदल झाला कीं त्यांची उदासीनता वाढून त्यांस विरक्तता आली; एके दिवशीं ते सद्‌गुरुशोधनास्तव घराबाहेर पडले. तीर्थयात्रा करीत ते पंढरपुरास जाऊन संतपदरजांत त्यांनीं लोळण घेतली. पुढें गोदातटीं लक्ष्मीधरदास नांवाच्या सत्पुरुषांनीं त्यांचा अधिकार पाहून त्यांजवर अनुग्रह केला. तेव्हांपासून तुकोपंत हे रमावल्लभदास या नांवानें प्रसिद्धीस आले.

लक्ष्मीधरांनीं त्यास गोदावरी आणि प्रवरा यांच्या संगमीं श्रीसिद्धेश्वरमहादेवाजवळ 'श्रीगोपाळविद्येचा' उपदेश केला. पंचवटींतील गोपाळ गोसावी नांवाच्या एका अधिकारी पुरुषानें त्यांना श्रीकृष्णावतारावर कवन करण्याची आज्ञा केली.

कांहीं दिवसांनीं 'बापू' या नांवाचा एक गृहस्थ रमावल्लभदासाकडे आला, व त्यांच्या संगतींत त्याला साक्षात्कार घडून तो कृतार्थ झाला.

## एक चमत्कार

पुढें ते फिरत फिरत वाई येथें गेलें असतां त्यांची त्यांचा बालमित्र कृष्णाजीपंत उर्फ कृष्णा गोसावी याची भेट झाली; तसेंच इतर संतही त्यांना भेटले. या संतांपैकीं उमावल्लभदास हे कट्टे शिवभक्त होते. शंकराशिवाय दुसऱ्या देवाचे नांव ते घेत नसत व अन्य देवतेच्या मूर्तिला ते वंदनही करीत नसत. त्यांच्या उलट रमावल्लभदास हे कट्टर कृष्णभक्त होते. ते कोणत्याही प्रतिमेला 'जय गोपाल' असें म्हणून नमस्कार करीत असत. उमावल्लभदास एकदां शंकराच्या देवळांत पूजा करीत बसले असतां, रमावल्लभदास संतमंडळीसह तेथें गेले व 'जय गोपाळ' असा नामघोष त्यांनीं केला. तेव्हां असा चमत्कार झाला कीं, तेथें शंकराच्या ऐवजीं श्रीकृष्णाची शंखचक्रपद्मगदाधारी सुंदर चतुर्भुजमूर्ति दिसूं लागली. हें पाहून सर्व संतमडळीस व उमावल्लभदासासही मोठें आश्चर्य वाटलें. उमावल्लभदासांचा संदेह फिटला व त्यांनीं रमावल्लभदासांसह सर्व संतांस साष्टांग नमस्कार घातला.

हा अद्‌भुत चमत्कार घडल्यावर रमावल्लभदासांची कीर्ति सर्वत्र पसरली व पुष्कळ संत त्यांना भेटावयास येऊं लागले. पुढें आपल्या बालमित्राच्या आग्रहास्तव ते त्याच्याबरोबर कोंकणांत गेले. त्यांना पाहून तिकडील लोकांना फार आनंद झाला. त्यांच्या सहवासानें आणि उपदेशानें पुष्कळ लोक कृष्णभक्तीस लागले.

## लक्ष्मीबाईचें कर्णफूल

त्यानंतर कांहीं दिवस आपल्या गांवीं राहून ते आपल्या मित्र व शिष्यवर्गासह कर्नाटक प्रांतांत गेले. तिकडे ते एकदां श्रीक्षेत्र गोकर्ण येथें गेले असतां तेथें मोठी यात्रा भरली होती. लक्ष्मीबाई नांवाची एक सारस्वत ब्राह्मण बाई समुद्रांत स्नान करीत असतां तिचें कर्णफूल पाण्यांत पडलें. पुष्कळ शोध करून ते न सांपडल्यामुळें ती फार चिंताक्रांत झाली. रमावल्लभदास तेथें जवळच होते. त्यांनीं लक्ष्मीबाईस सांगितले, 'बाई तूं समुद्राची प्रार्थना कर म्हणजे तुझा दागिना तुला मिळेल.' त्याप्रमाणें तिनें करतांच तें कर्णफूल तिला मिळालें. या गोष्टीचा लक्ष्मीबाईच्या मनावर एवढा परिणाम झाला कीं, रमावल्लदासांच्या पायांवर डोकें ठेवून आपल्या यल्लापूर गांवीं येण्याची तिनें त्यांस विनंति केली. व ते यल्लापुरास गेले. बाईने त्यांची मनोभावें सेवाचाकरी केल्यामुळें एकेदिवशीं त्यांनीं तिला उपदेश देऊन तिचें 'आवडी' असें नांव ठेवलें. याच नांवानें ती पुढें प्रसिद्ध आली.

त्या चातुर्मासांतील श्रीकृष्ण जयंतीचा उत्सवही रमावल्लभदासांनीं तिच्याकडे करविण्याचें ठरविलें. तिला मोठा आनंद झाला. परंतु सांपत्तिकस्थिति चांगली नसल्यामुळें उत्सव कसा पार पडेल याची तिला काळजी पडली. तिच्या पतीनें परगांवीं

जातांना तिच्याकडे खर्चासाठीं चार होन दिले होते. आवडीचा चिंतातुर चेहरा पाहून रमावल्लभदासांनी ते होन तिच्याकडून मागून घेऊन मंत्राक्षता घालून एका ताईतांत ठेवले. तिला सांगितलें कीं, जरूर पडेल तेव्हां त्यांतला एक होन काढून घे पण ताईत मात्र पालथा करूं नकोस. श्रीकृष्ण जन्म महोत्सव फार थाटानें पार पडला. गांवांतील कांहीं दुर्जनांस या गोष्टीचें मोठें वैषम्य वाटलें. आवडीचा नवरा घरी येत असतांना त्याला वाटेंत गांठून खोट्यानाट्या गोष्टी सांगून त्यांनीं त्याचें मन कलुषित केलें. घरीं येतांच त्यानें, ' मी दिलेले होन कोठें आहेत. " असें मोठ्या रागानें आपल्या बायकोला विचारलें तेव्हां त्या साध्वीनें स्वामीनें दिलेला ताईत त्याच्या हातीं दिला. ताईत पालथा करतांच चार होन खालीं पडले. हा चमत्कार पाहून त्याला पश्चात्ताप झाला व तो स्वामीस शरण गेला. स्वामीनींही त्याच्यावर अनुग्रह करून त्याला कृष्णभक्तीस लावलें. स्वामींच्या कृपेनें हा आवडीचा पति नारायण अप्पा हा पुढें म्हैसूर संस्थानचा दिवाण झाला. त्याची योग्यता एवढी वाढली तरी त्याचा विनय कमी झाला नाहीं. श्रीकृष्ण-जन्मोत्सव मोठ्या थाटानें व प्रेमानें ते दरवर्षी करूं लागले. या उत्सव मंदिरास ' आवडीचा मठ ' असें नांव पडलें तें अद्याप तसेंच चाललें आहे. श्रीरमावल्लभदास दूर देशीं असतांना त्यांनीं नारायणास व आवडीस परमार्थ बोधपर पत्रें पाठविलीं आहेत.

आवडाबाईला ज्या कर्णफुलामुळें सद्गुरु कृपालाभ झाला त्या कर्णफुलाचें नांव अद्याप त्या प्रांतीं सर्वांच्या मुखीं आहे. एखादी हरवलेली वस्तू सांपडली म्हणजे ' आवडाबाईचें कर्णफूल तें ' या म्हणीचा उच्चार करण्याची चालच तिकडे पडून गेली आहे.

### कृष्णोपासनेचा प्रचार

रमावल्लभदास हे पूर्ण ज्ञानी होते. त्यांची बहुतेक कविता गद्यप्राय आहे. ती पद्यात्मक आहे म्हणूनच तिला कविता म्हणायचें. समर्थ रामदासांनीं महाराष्ट्रांत जशी रामोपसना सुरूं केली, तशीच रमावल्लभदासांनीं कृष्णोपासना सुरूं केली.

रमावल्लभदास हे एकदां प्रवास करीत असतां, कोणत्याशा एका गांवीं त्यांचा मुक्काम पडला. तेथें एका श्रीमान् व श्रद्धावान् गृहस्थाच्या घरीं देवाचा वार्षिकोत्सव होत असे. नेहमींचा कथेकरी न आल्यामुळें त्यानें रमावल्लभदासांस कीर्तन करण्याची विनंति केली. व त्यांनींहि ती मान्य केली परंतु त्यांचे मुलगे त्यांचेबरोबर होते त्यांना ही गोष्ट आवडली नाहीं. आपलें उपास्य दैवत सोडून दुसऱ्या दैवताच्या उत्सवांत आपल्या वडिलांनीं भाग घेतला हें पाहून ते नाखूष झाले. उत्सव चालू असतांना त्यांची प्रकृति थोडीशी बिघडली म्हणून त्यांनीं आपल्या मुलांस कीर्तन करण्यास सांगितलें. पहिल्या तिघा मुलांनीं कीर्तन करण्याचें नाकारलें. शेवटीं रमावल्लभदासांनीं आपले कनिष्ठ चिरंजीव यादवबुवा यांस कीर्तन करण्याची आज्ञा केली.

हे यादवबुवा अगदीं मंदबुद्धि असून त्यांस दोन अभंगहि पाठ नव्हते. परंतु वडिलांविषयीं त्यांना फार पूज्य बुद्धि होती व तीच शेवटीं फळास आली. त्यांनी उठून वडिलांच्या पायांवर मस्तक ठेविलें व म्हटलें, 'आपली आज्ञा मला शिरसामान्य आहे. आपल्या कोणत्याहि आज्ञेचें मी आजपर्यंत उल्लंघन केलेलें नाहीं. परंतु कीर्तनाच्या बाबतींत माझा अधिकार काय आहे हें आपण जाणतच आहांत. मला दोन शब्द देखील शुद्ध बोलतां येत नाहींत. अशा स्थितींत मी कीर्तन कसें करणार ?' इतकें बोलून यादवबुवांनीं पुन्हां आपल्या वडिलांस साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां त्यांनीं त्यांस उठविलें आणि आपला विडा त्याच्या तोंडांत घातला. त्याबरोबर दिव्य ज्ञानशक्ति यादवबुवांच्या अंगांत संचरली व त्यांनीं असें सुंदर कीर्तन केलें कीं, तें ऐकून सर्व लोकांना मोठें आश्चर्य वाटलें.

आपल्या मतिमंद कनिष्ठ बंधुकडून आपल्या पित्यानें सुश्राव्य कीर्तन करविलें हें पाहून त्यांचे तिन्ही वडील बंधु पित्याच्या आज्ञेंत वागूं लागले. हल्लीं सोलापूर येथें रमावल्लभ दासांचा वंश आहे. तो या शेवटच्या अनुग्रहीत मुलाचाच होय.

रमावल्लभदासांनीं आपलें पूर्वीचें कुळगोत्र व नंतरचें त्याचें रूपांतर याविषयीं एका अभंगांत बहारीचें वर्णन केलें आहे.

मुळीं लागतां सहज । मायबाप नाहींत मज ॥  
झालों पोसणें संतांचें । मन कोवळें तयांचें ॥  
गोत्र अगस्ति होते साचें । आतां गोत्र व्यापकांचें ॥  
ऋग्वेदी होतों पहिले । आतां भागवती वहिले ॥  
नाम घोषाचा आचारू । श्रीमद्गीतेचा विचारू ॥  
पूर्वीं संध्या ते त्रिकाळ । प्रेमसंध्या सर्वकाळ ॥  
पूर्वीं गुरु तो मतभेदी । आतां मन जी अभेदी ॥  
पूर्वीं बोलिलों लौकिक । आतां बोलों अलौकिक ॥  
पूर्वीं मान म्यांच घ्यावा । आतां मान सर्वां द्यावा ॥  
पूर्वीं रुचे चतुरपण । आतां भोळीव आपण ॥  
पूर्वीं मुक्तीलागीं वाहे । आतां भक्तीलागी वाहे ॥  
पूर्वीं तारक होता हरि । आतां तारक मजला करी ॥  
पूर्वीं होतों परतंत्र । आतां सर्वांशीं स्वतंत्र ॥  
पूर्वीं रुपें रूपनाम । आतां नाहीं त्याचें काम ॥  
नामरूप जाऊन भास । अवघा रमावल्लभदास ॥

रमावल्लभदास केव्हां व कोठें पंचत्व पावले यासंबंधीं कांहींच माहिती उपलब्ध नाहीं.

———

# श्री गुरुग्रंथांतील नामदेवांची वाणी

अनुवादक : गणेश विष्णु कविटकर, एम्. ए.

संत नामदेव यांच्या काळास सुमारें सातशें वर्षें होऊन गेलीं तरी त्यांच्या कार्याचें महत्त्व उत्तरोत्तर अधिकाधिक पटत चाललें आहे. त्यांचा महोत्सव गेल्या महिन्यांत मुंबईत व इतरत्र त्यांच्या भक्तांनीं थाटांत साजरा केला. भक्तिभावाचा व विठ्ठल नामाचा प्रचार त्यांनीं भारतभर केला. महाराष्ट्रांतच नव्हे तर सौराष्ट्र, काठेवाड व पंजाब प्रांतांतही त्यांच्या विठ्ठल भक्तीची पताका फडकली. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिखांचा पवित्र असा जो आदिग्रंथ त्यांतही नामदेवांची भक्तिरसपूर्ण पवित्र वाणी ग्रथित होऊन राहिली आहे. त्यांच्या या ग्रंथ-साहेबांत नामदेवांचे एकसष्ट अभंग आहेत. ते निवडून काढून त्यांचें मराठी सुलभ भाषांतर श्री. कविटकर यांनीं श्रीसाईलीले-साठीं केलें असून तें क्रमशः प्रसिद्ध करण्यांत येत आहे. नामदेव हे आम्हा महाराष्ट्रीयांस जसे जवळचे व पूज्य आणि आदरणीय वाटतात त्याचप्रमाणें गुजराथेंत, राजपुतान्यांत व पंजाबांतही आदरणीय होऊन राहिले आहेत. राजपुतान्यांतील शिंपी ज्ञातीनें नामदेवांचें नावच आपल्या ज्ञातीला दिलें आहे. त्या भागांत नामदेवांचीं असंख्य मंदिरें आहेत. सौराष्ट्रांत संत नरसी मेहता यांच्या 'हरमाळा' या काव्यांत नामदेवासंबंधीं अनेक उल्लेख आहेत. उत्तर प्रदेशांतही त्यांचे अनेक भक्त आहेत. पंजाबांतील त्यांचें कार्य फारच व्यापक स्वरूपाचें आहे. अशा थोर भगवद्भक्ताची ही अमृतवाणी आहे.

: ३० :

मुलें कागदाचा पतंग करून आकाशांत उडविण्यासाठीं सोडून देतात, सोबत्यांशीं गप्पा गोष्टी करीत असतात, पण त्यांचें लक्ष पतंगाच्या दोरीकडे खरोखरी असतें. सुवर्णकाराचें चित्त अलंकार घडवित असतां त्याच्या घडवणुकीकडे, पाण्यानें भरलेले कुंभ घेऊन हास्यविनोद करीत चालणाऱ्या राजदासीचें चित्त घागरीकडे, दशद्वार असलेल्या गांवाबाहेर पांच कोस दूर चरावयास गेलेल्या गाईचें चित्त वासरांकडे व बालकास पाळण्यांत निजवून आंतबाहेरच्या कामाकाजांत गुंतलेल्या आईचें चित्त बालकाकडे जसें असतें, तसेंच हे त्रिलोचना, माझें मन रामनामीं वेधून गेलें आहे.

: ३१ :

वेद, पुराणें व शास्त्रें यांत अनंत गीतें व काव्यें आहेत, पण मी त्यांचें गायन करणार नाहीं. अनंत आकाशांत आणि निराकार प्रदेशांतून निघणाऱ्या अनुहात ध्वनीनें मी वाद्य करीन व विरक्त अंतःकरणानें ईश्वराचें गाणें गाईन. शब्दांच्या पलिकडे असलेल्या अनुहाताशीं मी माझा आत्मा एकरूप करीन व माझ्या घरीं जाईन. मी इडा व पिंगळा ( उजव्या व डाव्या ) या दोन नाड्यांचें नियंत्रण ( श्वासवायूंचें विरोधन ) समाधि साधावी म्हणून करणार नाहीं, तर या नाड्यांना सारखें लेखून आणि चंद्र व सूर्य ( डावा व उजवा नेत्र ) यांना सहकारी समजून मी ब्रह्मज्योतींत लीन होईन. मी तीर्थयात्रेला जाणार नाहीं अगर जलाशयांत प्रवेश करणार नाहीं किंवा तेथील जीवजंतूंना पीडा देणार नाहीं. माझ्या ठिकाणीं माझ्या देहांत श्रीगुरूंनीं अडुसष्ट तीर्थांचें दर्शन करून दिलें आहे. त्यांत मी स्नान करीन. पंचमंडळी मला भले म्हणोत किंवा माझी निंदा करोत. मला या गोष्टीशीं काय करावयाचें आहे ? नामदेव म्हणतात, माझें चित्त श्रीहरीच्या ठिकाणीं रमलें आहे व शून्य समाधींत मी अंतर्बाह्य सामावून गेलों आहे.

: ३२ :

ज्यावेळीं आई नव्हती, बाप नव्हता, कर्म नव्हतें, देह नव्हता, मी नव्हतों, तूं नव्हतास तेव्हां कोण होतें ? व ते कोठून आले होते ? हे रामराया ! वृक्षावर बसलेल्या पक्षाप्रमाणें या जगांत कोणी कोणाचें नाहीं. जेव्हां चंद्र सूर्य नव्हते त्यावेळीं पाणी व पवन यांचें मिश्रण होतें. वेद व शास्त्र यांची ओळख नव्हती त्यावेळीं कर्म कोठून आलें ? इहलोकीं संत खेचराकडून गुरुप्रसाद म्हणून तुलसीमाला मिळाली. नामदेव म्हणतात, देवानेंच सद्‌गुरु होऊन मला परमतत्वाचें दर्शन करून दिलें.

: ३३ :

काशीला जाऊन तप केलेत अथवा तीर्थाचें ठिकाणीं उलटे टांगून तपश्चर्या केलीत किंवा अग्नींत जाळून घेतलेत अथवा शरीर कल्पांतापर्यंत टिकावें म्हणून कायाकल्प केलात, तसेंच अश्वमेध यज्ञ अथवा गुप्त सुवर्णदान केलेत तरी ही सर्व साधनें श्रीरामनामाची बरोबरी करूं शकत नाहींत. अरे पाखंडी मना ! हे ढोंगी मार्ग सोडून दे आणि नित्य श्रीहरीचें नामस्मरण कर. कुंभमेळ्याचे वेळीं गंगा, गोदावरी, केदारनाथ इत्यादि क्षेत्रांत जाऊन स्नान केलेत, गोमती क्षेत्रांस जाऊन हजारो गाई दान केल्या, कोट्यवधि तीर्थें केलीं, हिमालयांतील बर्फमय प्रदेशांत तपश्चर्या केली, तरीदेखील श्रीरामनामाची बरोबरी होऊं शकत नाहीं. घोडे, हत्ती, शय्या नारी आणि जमीन यांचीं दानें सतत केलींत, स्वतःला शुद्ध करवून सुवर्णतुला केली तरीसुद्धां या साधनांना श्रीरामनामाची सर येणार नाहीं. स्वतःवर रोष करून घेऊं नकोस किंवा त्या काळाला, मृत्यूला दोष देऊं नकोस. तर शुद्ध निर्वाणपदाची प्राप्ति करून घे. नामदेव म्हणतात, दशरथरामाचा नंदराज श्रीराम प्रभूच्या कृपेनें या परम तत्वामृताचें मी प्राशन केलें.

———

२८९

# संत समागम गोड



दासोपंत हे एक थोर सत्पुरुष होऊन गेले. ईश्वर वेळप्रसंगीं आपल्या परम भक्ताचें कसें रक्षण करतो हें संत दामाजी यांच्या चरित्रावरून आपणांस माहीत आहे. जवळजवळ तोच प्रकार दासोपंतांच्या बाबतींत घडून आला. दामाजीपंत विठ्ठलभक्त होते, तर दासोपंत दत्तभक्त होते. एवढाच फरक. देव आपल्या भक्ताच्या हांकेला ऐनवेळीं कसा धांवून येतो, तें पहा !

ईश्वरभक्त संत पदनतांचें उद्धारासाठीं या भूतलावर अवतरतात. लोकसंग्रहाचें आणि लोककल्याणाचें कार्य करीत असतांना, त्यांच्यांवर अनेक संकटें येतात. तरी पण ईश्वरावरील असीम भक्ति व निष्ठेमुळें ते आपलें कार्य चालू ठेवतात. देवही वेळो वेळीं आपल्या भक्तांना संकटांतून मुक्त करून त्यांची लाज राखतात. मंगळवेढ्याचे दामाजीपंत ठाणेदारांनी दुष्काळाच्या वेळीं सरकारी धान्य कोठारें लुटविलीं. बादशाही शिपायांनीं त्यांना अटक करून नेलें. विठ्ठलाचे भक्त ते ! विठू महाराचें रूप घेऊन देवानें दामाजीपंत दरबारांत पोहचण्यापूर्वीच धान्याची किंमत बादशाहास देऊन पावती घेतली हें आपणांस विदित आहे. असाच एक प्रसंग नाथ चरित्रांतही आहे. पैशांची जरूर पडल्यामुळें उद्धवानें सावकाराकडून एक हजार रुपये काढून त्याला लिहून दिलें. नाथांच्या घरीं नेहमींच अन्नसंतर्पण चालू असल्यामुळें व नाथांना उपजीवीकेचें कांहींच साधन नसल्यामुळें सावकारास पैशाबद्दल काळजी वाटू लागली. त्यानें रकमेची फेड होईपर्यंत नाथांस अन्न न घेण्याची शपथ घातली. देवाला नाथांची काळजी. भर मध्यरात्रीच्या वेळीं त्यानें उद्धवाचें रूप घेऊन सावकाराचें दार ठोठावलें. व वहींत निघणाऱ्या बाकीप्रमाणें पैसे चुकते केले. अशीच एक घटना प्रसिद्ध दत्तभक्त श्रीदासोपंत यांच्या पूर्वायुष्यांत घडून आली. ती हृदयंगम तशीच उद्बोधकही आहे.

## दासोपंतावर दारुण संकट

नारायण पेठ हा महाल बेदरच्या बहामनी राजाच्या ताब्यांत होता. दासोपंताचे वडील दिगंबरपंत या महालाचे देशपांडे असल्यामुळें तेथील जमाबंदी करून वसूल झालेले सगळे रुपये त्यांना बेदर येथें पाठवावे लागत. एके वर्षीं त्या प्रांतांत दुष्काळ पडला. त्यामुळें कराचे पैसे मुळींच वसूल झाले नाहींत. दोन लक्ष रुपयांची कराची रकम वेळेवर न आल्यामुळें बादशाहानें दिगंबरपंतास व दासोपंतांना शिपायाकरवीं अटक करून बेदरास नेलें. व पैसे दिल्याशिवाय सुटका होणार नाहीं असें

त्यांना सांगण्यांत आलें. दिगंबरपंतांनीं बादशहाची विनवणी केली पण व्यर्थ ! अखेर त्यानें दासोपंतास जामीन ठेवून दिगंबरपंतास एक महिन्याची मुदत दिली व त्यास वसूल गोळा करण्यास नारायणपेठेस परत पाठविलें. पण अशी अट घातली की मुदतीच्या आंत पैसे न भरल्यास दासोपंतास मुसलमान धर्माची दीक्षा देण्यांत येईल. नाईलाजानें व मोठ्या कष्टानें दिगंबरपंतांनीं तसा करार लिहून दिला. पित्यास कष्टी झालेलें पाहून दासोपंतानीं त्यांस धीर दिला. ते म्हणाले, 'श्री दत्तात्रेय समर्थ आहे; तो या संकटांतून आपल्याला खात्रीनें सोडवील.' पुत्राचा मोठ्या दुःखानें निरोप घेऊन दिगंबरपंत आपल्या गांवीं परत गेले.

## बादशहाचा स्वार्थ

दासोपंत दिसावयास फार सुंदर होते. दासोपंतांचें सौंदर्य पाहून बादशहाचे मनांत लोभ उत्पन्न झाला होता; कारण त्यास पुत्रसंतति नव्हती. दिगंबरपंत दोन लक्ष रुपये कोठून आणणार ? अर्थात् मुदत भरतांच आपण दासोपंतास मुसलमान करून आपल्यामागें त्यास राज्याचा अधिकारी करावें असा बादशहाचा हेतु होता. या स्वार्थी हेतूनेंच त्यानें वरील अट दिगंबरपंतास घातली होती.

दासोपंत बेदरास असतां नजीकच्या 'झरणीनृसिंह' नामक नृसिंहक्षेत्रावर ते नित्य स्नानास जात व दररोजच्या शिध्यासाठीं बादशाही खजिन्यांतून देण्यांत येणारा रुपया ब्राह्मणांस वाटून टाकून ते ईश्वरचिंतन करीत उपाशीं राहत. तथापि, ईश्वरीकृपचें तेज विलक्षण असल्यामुळें, त्यांच्या शरीरावर क्षुधेचा बिलकूल परिणाम झाला नाहीं, इतकेंच नव्हे तर उलट, पूर्वींच्या पेक्षां ते अधिक तेजस्वी व पुष्ट दिसूं लागले. लोकांना मोठें आश्चर्य वाटलें.

इकडे मुदतीचे दिवस कधीं संपतात, व दासोदिगंबरास आपण मुसलमान कधीं करतों असें बादशहास झालें होतें. तो सारखा दिवस मोजीत बसला होता. तिकडे नारायणपेठेस, बिचारे दिगंबरपंत व त्यांची पत्नी, पैसे तर मिळत नाहींत. आतां पुत्राचें काय होतें, या काळजींत दिवस कंठीत होती. अशाप्रकारें मुदत अगदीं भरत आली; तेव्हां दासोपंतांसही मोठी काळजी उत्पन्न झाली, ते मनाशींच म्हणतात. 'पूर्वसुकृतानें महत् भाग्यें करून ब्राह्मणकुळीं जन्म प्राप्त झाला आहे. करितां याजन्मीं तरी ईश्वरभक्ती करून मुक्ति मिळवावी अशा विचारांत होतों तोंच दुर्दैवानें हे संकट येऊन उभें राहिलें !"

## दत्ताचा धांवा

शेवटीं अखेरचा दिवस येऊन ठेपला. त्यादिवशीं संध्याकाळीं बादशहानें दासोपंतांस सांगितलें कीं आज रात्रौ वसुलाचे पैसे न आल्यास उद्यां तुम्हांस मुसलमान केलें जाईल. हें ऐकून दासोपंतास भय वाटलें. त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या.

आतां काय होईल तें होवो आपण श्रीदत्तावर भार टाकून स्वस्थ राहावें असा निश्चय करून त्यांनीं मोठ्या कळवळयाने दत्तांचा धांवा केला.

याप्रमाणें दासोपंत देवाची आळवणी करीत असतां मुदतीचा शेवटचा दिवस संपला. बादशहाचा आनंद तर त्रैलोक्यांत मावेना ! त्यानें काजी, कित्येक यवन आणि ब्राह्मण पंच आणून दिगंबर पंतांचें करारपत्र त्यास दाखविलें व कराराप्रमाणें मुदतीच्या आंत रकमेची भरपाई न झाल्यामुळें आपण दासोपंत यास इस्लामी धर्माची दीक्षा देणार असें त्यांस सांगितले. सगळ्या ब्राह्मणांस फार वाईट वाटलें, पंतावरील संकट टाळण्यासाठीं त्यांनीं परमेश्वराची भक्तिपूर्वक करुणा भाकिली. बादशहाच्या हुकुमावरून दासोपंतास दरबारांत आणून उभे केलें. ते देहभानावर नव्हते. समाधी लागल्यासारखी त्यांची स्थिति झाली होती. सगळे लक्ष भगवंताकडे होतें.

अशा परिस्थितींत देवास मोठी काळजी पडली. त्यानें वसुली करणाऱ्या महाराचें स्वरुप धारण करून खांद्यावर कांबळी व हातांत काठी अशा थाटानें पैशांच्या हुंड्यांसह दरबारात येऊन बादशाहास सलाम केला व दिगंबर पंताकडील पैशांची भरपाई करून घ्या म्हणून सांगितलें. पहिल्यानें त्याच्याकडे कोणाही दरबारी माणसाचें लक्ष गेलें नाहीं. पुन्हां एकदां पैसे घेण्याविषयीं ओरडून सांगितल्यावर कांहीं शिपायांनीं त्याची चौकशी केली. तो म्हणाला, मी नारायण पेठेहून दिगंबरपंताकडून आलों आहे. दोन लक्ष रुपयांच्या ह्या हुंड्या त्यांनीं पाठविल्या आहेत. ह्या घेऊन मला पावती द्या. ' महाराचे हे शब्द ऐकतांच ब्राह्मणांस मोठा आनंद झाला. दासोपंतांनीं नेत्र उघडून पाहिले तों महार तेथें उभा आहे. ह्या गोष्टीचें त्यांस मोठें आश्चर्य वाटलें व याबद्दल त्यांनीं भगवंताचे आभार मानले.

## दत्तमहाराज महार बनले

इकडे बादशहाचा व त्या नोकर महाराचा ( दत्तमहाराजांचा ) काय संवाद झाला तो आतां ऐका—

' त्या काळीं पादशा आपण । पुसतसे त्या मनुष्या लागून ॥
' अरे तूं कोठील ? कोण ? । कोणी तुजला धाडिलें ? ॥ १ ॥

येरू म्हणे दिगंबराचा सेवक । जाणून आम्हास फार विश्वासूक ॥
हुंड्या देऊन आमुचे हस्तक । पाठविला असे सर्वस्व ॥ २ ॥

पादशा म्हणे, ' तूं चाकर । किती दिवसांचा निर्धार ॥
आणि नामही सत्वर । सांग आतां या काळीं ॥ ३ ॥

' नाम तो दत्ताजी जाण । चाकर सातपिढ्या पासून ॥
मुशारा पुसतां पूर्ण । बोले, ' अन्नार्थी मी असें ॥ ४ ॥

त्यांनीं मजला टाकून । कदापि न राहती एक क्षण ॥
जागृती, सुषुप्ती आणि स्वप्न । त्यांचे सन्निध मी असें ॥ ५ ॥

आपुला जो बाकी पैका । त्याच्या हुंडया असे देखा ॥
हे दर्शनी हुंडया अतिचोखा । यांस उधार नसे चि ॥ ६ ॥

हुंडयाचा विश्वास नसे तुम्हासी । तरी द्रव्य रोकडें असे मजपाशीं ॥
तें देईन संपूर्ण निश्चयेसी । घ्यावें आतां या काळीं ॥ ७ ॥

## बादशहा वेडा झाला

इतकें बोलून त्या महारानें द्रव्याची पिशवी भर दरबारांत रिकामी केली! दरबारी लोक पाहतात तों पैशाची मोठी रास पडलेली! कारकुनांनीं द्रव्य मोजून घेतांच, तो महार तेथल्या तेथें गुप्त झालेला पाहून बादशाहादि सर्व लोकांस मोठें आश्चर्य वाटलें. बादशाहाची स्थिति तर वेड लागल्यासारखीच झाली! तो:—

म्हणतसे, दावा दावा रे तो पाडेवार । वास्तव फुटतात कीं माझे नेत्र ॥
नेत्रांचे तेज साचार । तो मजला ऐसा पैं गमतो ॥ १ ॥

जळो जळो हे द्रव्यराशी । वास्तव संभाषण त्यासी ॥
नाहीं केलें कीं, मी पापराशी । तो कैसा मजला भेटेल? ॥ २ ॥

तो काय या सभास्थानीं । गेला कीं मोह घालुनी? ॥
सर्वत्रांची दृष्टी चोरूनी । गेला कोठें कळेना ॥ ३ ॥

त्यासी देऊनि फार इनाम । करूं त्यासी अति संभ्रम ॥
या बाळासी पाठवूं त्या समागम । ऐशी इच्छा पैं होती ॥ ४ ॥

हुडका, हुडकारे! चहुंकडे । गेला गेला तो कोणीकडे? ॥
सत्वर आणारे! दृष्टीपुढें । माझ्या आतां अविलंबें ॥ ५ ॥

याप्रमाणें बादशहाची बडबड संपल्यावर सेवकांनीं त्यांस सांगितलें कीं, तो महार आतांच येथल्या येथें गुप्त झाला. अर्थात त्यास शोधून कसा आणितां येईल? ही गोष्ट आमच्या सामर्थ्याबाहेरची आहे.

यावर, बादशहा दासोपंताकडे वळून म्हणाला, "या बाळाचें दैव मोठें म्हणून त्याच्यासाठीं हा देवच महाराच्या वेषानें आला होता. तरी आतां ह्यास मी त्याच्या बापाकडे पाठवून देतों." नंतर तेथें जमलेल्या सर्व ब्राह्मणांनीं तो मुलगा कसा उपाशी राहत असे, केवळ ईश्वरी कृपेनेंच तो अद्याप कसा सतेज दिसत आहे, इत्यादि हकिकत बादशहास निवेदन केली. ती ऐकून त्यास परम आश्चर्य वाटलें. त्यानें दासोपंतांस आलिंगिलें, व त्यांस अनेक रत्नालंकार व वस्त्रोपवस्त्रें देऊन व प्रतिवर्षी आपली भेट घेण्यास सांगून त्यांच्या गांवीं पाठविलें.

---

# परमात्म शक्तीचा अनुभव

—आचार्य विनोबा

जोंपर्यंत देहांत असलेल्या आत्म्याचा विचारच नसतो तोंपर्यंत मनुष्य सामान्य क्रियेंतच गुरफटलेला असतो. भूक लागली म्हणजे खावें, तहान लागली म्हणजे पाणी प्यावें, झोप आली म्हणजे निजावें, याहून जास्त त्याला माहीत नसतें. यासाठीं तो भांडेल यासाठीं तो लोभ करील. अशा प्रकारें दैहिक क्रियांतच तो मग्न राहतो. विकासाला यापुढें सुरवात व्हावयाची. हा वेळपर्यंत आत्मा फक्त पाहत असतो. विहिरीकडे रांगत जाणाऱ्या लहान लेंकराच्या पाळतीवर जशी पाठीमागें आई उभी असते, त्याप्रमाणें आत्मा उभा असतो. शांतपणें तो सर्व क्रिया पाहतो. या स्थितीला "उपद्रष्टा" साक्षिरूपाने सर्व बघणारा, असे म्हटलें आहे.

आत्मा पाहतो परंतु अजून संमति देत नसतो. परंतु स्वतःला केवळ देहरूप समजून क्रिया करणारा हा जीव पुढें जागा होतो. आपण पशूसारखें जीवन कंठीत आहोंत याची त्याला जाणीव होते. जीव या विचारावर आला म्हणजे नैतिक भूमिका सुरू होते. मग योग्यायोग्य हा प्रश्न पदोपदीं उभा राहतो. मनुष्य विवेक करूं लागतो, पृथक्करणात्मक बुद्धि जागृत होते. स्वैर क्रिया थांबतात. स्वच्छंद जाऊन संयम येतो. या नैतिक भूमिकेवर जीव आला म्हणजे मग आत्मा नुसता स्वस्थ बसून पाहत नाहीं. तो आंतून अनुमोदन देतो. 'शाबास' असा धन्यतेचा आवाज आंतून येतो. आत्मा केवळ उपद्रष्टा न राहतां आतां 'अनुमंता' होतो.

## अतीथि सत्कार

भुकेलेला अतिथि दारांत यावा व तुम्हीं आपल्या पुढचें ताट त्याला द्यावें, म्हणजे मग रात्रीं जेव्हां ती सत्कृति स्मराल त्या वेळेस पहा कसा आनंद होतो तो! आंतून आत्मा हळूंच म्हणतो, 'चांगलें केलेंस.' आईनें मुलाच्या पाठीवरून हात फिरवून 'चांगलें केलेंस बाळ' असें म्हटलें तर दुनियेंतील सारी थोर बक्षिसी आपणांस मिळाली असें त्याला वाटतें. त्याप्रमाणेंच हृदयस्थ परमात्म्याचा 'शाबास मुला' हा शब्द आपणांस उत्तेजन देतो, उत्साह देतो. भोगमय जीवन सोडून नैतिक जीवनाच्या भूमिकेवर जीव या वेळेस उभा असतो.

यापुढची भूमिका अशी. नैतिक जीवनांत कर्तव्य करीत असतांना मनाचे सारे मळ धुण्यासाठीं मनुष्य प्रयत्न करतो. परंतु असे प्रयत्न करतां करतां मनुष्य थकतो अशा वेळेस 'देवा, माझ्या प्रयत्नांची पराकाष्ठा झाली. मला अधिक शक्ति दे, अधिक बळ दे" अशी जीव प्रार्थना करतो. जोंपर्यंत सारें प्रयत्न होऊन आपण आपण एकाकीं पुरे

पडत नाहीं. हे अनुभवास येत नाहीं तोंपर्यंत प्रार्थनेचें स्वारस्य मनुष्याच्या लक्षांत येत नाहीं. आपली सारी शक्ति वेचून, ती पुरी पडत नाहीं असें पाहून, आर्त होऊन, देवाला द्रौपदीप्रमाणें हांक मारावी, त्याचा धांवा मांडावा परमेश्वरी कृपेचा व साहाय्याचा झरा वाहूनच राहिला आहे. ज्याला ज्याला तहान असेल त्यानें हक्कानें येऊन पाणी प्यावें ज्याला तूट पडेल त्यानें मागून घ्यावे अशा तऱ्हेचें नातें या भूमिकेवर असते. परमात्मा आधिकच जवळ येतो. आतां केवळ शाब्दिक शाबासकी न देतां तो साहाय्य करावयास धांवतो.

## चालू दे घडपड

प्रथम परमेश्वर दूर उभा होता. गुरु शिष्याला ‘ गणित सोडव ’ असें सांगून दूर उभा राहतो. त्याचप्रमाणें भोगमय जीवनांत जीव गुंतला असतां परमात्मा दूर राहतो व म्हणतो, ‘ ठीक आहे, चालू दे घडपड. ’ यानंतर नैतिक भूमिकेवर जीव येतो. या वेळेस परमात्म्यास केवळ तटस्थ राहवत नाहीं. जीवाच्या हातून सत्कर्म होत आहे असें पाहतांच देव हळूंच डोकावतो व ‘ शाबास ’ म्हणतो. अशा रीतीनें सत्कर्में होत होत चित्ताचे स्थूळ मळ जाऊन सूक्ष्म मळ धुण्याची जेव्हां वेळ येते, आणि जेव्हां सारे प्रयत्न त्या बाबतींत अपुरे पडतात, त्या वेळेस आपण देवास हांक मारतों व तो ‘ ओ ’ देतो. तो धांवून येतो. भक्ताचा उत्साह अपुरा पडतांच तो उभा राहतो. जगाचा सेवक सूर्यनारायण तुमच्या दाराशीं उभाच आहे. सूर्य बंद दार फोडून आंत शिरणार नाहीं, कारण तो सेवक आहे. तो स्वामीची मर्यादा पाळतो. तो दाराला धक्के देणार नाहीं. आंत स्वामी निजलेला असला तरी हा सूर्यरूपी सेवक दाराबाहेर उभा असतो. जरा दार किलकिलें करा कीं सगळाच्या सगळा प्रकाश घेऊन तो आंत शिरतो व अंधार दूर करतो. परमात्मा असाच आहे. त्याच्याजवळ मदत मागा कीं आलाच बाहू उभारून. कमरेवर हात ठेवून भीमातीरीं तो सज्ज होऊन उभाच आहे.

**‘ उभारूनि बाहे । विठो पालवीत आहे ’**

अशीं वर्णनें तुकारामादिकांनीं केली आहेत. नाक उघडें ठेवा कीं हवा आंत शिरलीच. दार किलकिले करा कीं प्रकाश आंत आलाच. हवा व प्रकाश यांचेहि दृष्टांत मला अपुरे वाटत आहेत. त्यांच्यापेक्षांहि परमेश्वर अधिक संनिध, अधिक उत्सुक, आहे. तो उपद्रष्टा, अनुमन्ता न राहतां ‘ भर्ता ’ सर्वस्वी मदत करणारा होतो. मनाचे खळमळ धुण्याचे वेळेस अगतिक होऊन—‘ **मारी नाड तमारे हाथे प्रभु संभाळजो रे** ’ असें आपण म्हणतो. ‘ **तूं ही एक मेरा मददगार है, तेरा आसरा मुझको दरकार है** ’ अशी आपण प्रार्थना करतों. मग का तो दयाघन दूर राहील ? भक्ताचा साहाय्यकारी परमात्मा, उणें पुरें करणारा तो प्रभु, पुढें होतो. मग तो रोहिदासाची चामडीं धुईल, सजन कसायाचें मांस विकील, कबीराचे शेले विणील. जनाबाईबरोबर दळू लागेल.

## पुढची पायरी

याच्या पुढची पायरी म्हणजे परमेश्वराच्या कृपाप्रसादानें कर्मांचें जें फळ मिळालें

तें फळहि आपण न घेतां देवाला दिलें पाहिजे, अशी भूमिका येते. जो देवाला म्हणतो, ‘तुझें फळ तूंच घे.’ देवानें दूध प्यावें म्हणून नामदेवानें हट्ट धरला. त्यांत फार गोडी आहे. हें सारें कर्मफलरूपी दूध नामदेव देवाला अर्पण करणार. अशा प्रकारें जीवनाची सारी पुंजी, सारी कमाई, ज्याच्या कृपेनें प्राप्त झाली त्यालाच अर्पावयाची. धर्मराज स्वर्गांत आतां पाऊल टाकणार तोंच त्याच्या बरोबरच्या कुत्र्याला मज्जाव होतांच जीवनांतील सर्व पुण्याईचें फळ म्हणून लाभलेला तो स्वर्ग–लाभ धर्मराजानें एका क्षणांत दूर लोटला, त्याप्रमाणेंच भक्तहि सारा फल–लाभ एकदम ईश्वरार्पण करतो. उपद्रष्टा, अनुमन्ता, भर्ता स्वरूपांत प्रतीत होणारा तो परमात्मा आता ‘भोक्ता’ होतो. शरीरांत तो परमात्माच भोग भोगून राहिला आहे अशा भूमिकेवर जीव चढतो.

याच्या पुढें संकल्प करणेंहि सोडून द्यावयाचें. कर्मामध्यें तीन पायऱ्या आहेत. प्रथम आपण संकल्प करतों, मग कार्य करतों व मग फळ येतें. कर्मासाठीं प्रभूची मदत घेऊन जें फळ मिळालें तें फळहि त्याला अर्पिलें. कर्म करणारा परमेश्वर, फळ चाखणारा परमेश्वर, आतां त्या कर्मांचा संकल्प करणाराहि परमेश्वरच होऊं दे. अशा प्रकारें कर्माच्या आदिमध्यान्तीं सर्वत्र प्रभु राहूं दे. ज्ञानदेवांनीं म्हटलें आहे कीं,

**‘माळियें जेउतें नेलें । तेउतें निवांतचि गेलें**
**तया पाणिया ऐसें केलें । होआवें गा’**

माळ्याला पाणी जेथें जेथें न्यावयाचें असेल, तेथें तेथें तें बिनतक्रार जातें. माळ्याचीं आवडीचीं फुलझाडें, फळझाडें तें पाणी वाढवितें. त्याप्रमाणें माझ्या हातून काय व्हावें हें त्यालाच ठरवूं दे. माझ्या चित्तांतील सर्व संकल्पांची जबाबदारी त्याचेवरच मला सोंपवूं दे. मी जर माझा भार घोड्यावर घातलाच आहे तर माझें ओझें मी आपली डोक्यावर घेऊन कशाला बसूं ? तेंहि घोड्याच्याच पाठीवर ठेवूं दे. माझ्या डोक्यावर घेऊन कशाला बसूं ? तेंहि घोड्याच्याच पाठीवर देवूं दे. माझ्यां डोक्यावर ओझें घेऊन मी घोड्यावर बसलों तरी त्या घोड्यालाच तो त्रास आहे. मग साराच बोजा घालूं दे त्याचे पाठीवर. अशा प्रकारें सर्वतोपरी जीवनाची चाळवाचाळव नाचवानाव फुलवाफुलव, करणारा सर्व कांहीं परमेश्वरच शेवटीं होतो. माझ्या जीवनाचा तो ‘महेश्वर’ होतो. अशा प्रकारें विकास होतां होतां सारें जीवनच ईश्वरमय होतें फक्त हा देहाचा पडदा राहतो. तो उडून गेला म्हणजे जीव व शिव, आत्मा व परमात्मा एकच होतात.

———



# भगवान व्यासांचें चिरंजीव कार्य

**भगवान व्यासांचें पुण्यस्मरण घडविणारी गुरु पौर्णिमा आम्हांला जागवून नुकतीच गेली. व्यासानीं महाभारत, भागवत व ब्रह्मसूत्रें आदि ग्रंथांच्या रूपानें भारतवासीयांवर केवढी कृपा करून ठेवली आहे, त्याची कल्पना पुढील लेखावरून थोडीशी होईल.**

आमच्या प्राचीन धर्माचा पाया वेद हाच होय त्या भरभक्कम व खंबीर पायावर आपल्या सनातन धर्माचें सुंदर मंदिर उभारण्यांत आलेले आहे. वेद म्हणजे प्रत्यक्ष भगवंताचा श्वास होय असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. मनूने स्मृतीत नमूद करून ठेविलें आहे कीं, वेद हेच धर्मांचा मुख्याधार आहेत. वेदोखिलो धर्ममूलं कलियुगापूर्वीच्या युगांतील लोक दीर्घजीवि तसेच फार बुद्धिमान् होते. कलियुगांतील लोकांचें आयुष्य फार तोकडे त्याच प्रमाणें त्यांची बुद्धीही तोकडी. तसेंच त्याच्यामागें सुखापेक्षां दुःखेच जास्त हात धुवून लागलेली असणार तंटे भांडणांत त्यांचा वेळ निघून जाणार मग वेदाध्ययन करायला त्यांना वेळ कुठून मिळणार !

आणि वेद तर जिवंत राहिले पाहिजेत. त्यांचा अभ्यास झाला पाहिजे, नाहींपेक्षां ते जगांतून नाहींसे होतील. त्यामुळें धर्मावर घाला येईल. धर्मांचा पायाच ढासळला मग काय शिल्लक रहाणार ? भगवंताच्या लक्षांत ही गोष्ट आल्याशिवाय कशी राहील ? वेदांचें रक्षण म्हणजे धर्माचे रक्षण आणि तें तर झालेंच पाहिजे. देवाला त्या गोष्टीची चिंता. आणि म्हणूनच द्वापार युगाच्या अखेरीस भगवंतांनीं पाराशर ऋषीच्या घरीं जन्म घेतला. पाराशर व त्यांची पत्नी सत्यवती यांचें भाग्य फार मोठे. त्यामुळें व्यासाच्या रूपानें भगवान त्यांच्या घरीं अवतीर्ण झाले.

व्यासांची कामगिरी फार मोठी आहे. सारेच वेद सर्वांकडून शिकले जाणार नाहींत या जाणीवेनें त्यांनीं वेदांची चार भागांत वांटणी केली व आपल्या चार शिष्यांना त्यांचा योग्य तो परिचय करून दिला. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद या नांवानें ते चार भाग ओळखले जातात.

सगळे वेद समजून घेतां आले नाहींत तरी त्यापैकीं एखाद्या वेदाचा कांहीं भाग तरी समजून घेण्यांत यावा. व्यास महर्षींनीं हा उपदेश मोठ्या कळकळीनें केला आहे व त्यांत त्यांचा उद्देश वेदांचें जतन झालें पाहिजे हाच आहे. वेद जिवंत रहावें अर्थात्

धर्म जिवंत रहावा, त्याचा लोप होऊं नये यासाठींच त्यांनीं हा उपदेश केलेला आहे. त्या उपदेशाचें रहस्य आपण समजून घेतलें पाहिजे.

तैतरेय उपनिषद हा यजुर्वेदाचा एक भाग आहे. त्यांत गुरुनें शिष्याला एक महत्वाची आज्ञा केली आहे. शिष्यानें जगांत कसें वागावें हें गुरूनें अगदीं सूत्ररूपानें सांगितलें आहे. गुरुनें शिष्याला सर्व प्रथम काय सांगितलें ? **'सत्यं वद'** 'धर्म चर.'

किती महत्त्वाचा उपदेश आहे हा ! परंतु त्या उपदेशाचें लोककल्याणासाठीं व बहुजन समाजाला समजण्यासाठीं खुलासेवार विवरण होणें आवश्यक. एरवीं जनतेला तें समजावें कसें ? आणि म्हणूनच पुराणाच्या व महाभारतासारख्या महाकाव्याच्या रूपानें ती शिकवण देणें जरूर होतें.

आणि याच उद्देशानें सत्य व धर्म ही जीं जीवनांतील दोन महान तत्वें, ज्यांना जीवनाधार म्हणतां येईल, तीं जनतेंत पसरावी, जनतेला त्यांचें महत्व समजावें व जनतेनें तीं आत्मसात करावी यासाठीं भगवान् व्यासांनीं महाभारत रचिलें. मनुष्यानें ऐहिक व पारलौकिक हित कसें व कोणत्या मार्गाचा अवलंब करून साधावें व इह-परलोकी कसें वागावे याचे जरूर ते ज्ञान त्या महान् ग्रंथाच्या रूपानें देण्यांत आलें आहे. महाभारत हा जीवनास जरूर ती प्रेरणा देणारा महाग्रंथ आहे. म्हणूनच त्याला पांचवा वेद असेंहि म्हणतात.

भारताला हा ग्रंथ देऊन भारतवासीयांस व्यासांनीं कायमचें ऋणी करून ठेविलें आहे. तें ऋण कधींहि व कोणत्याहि मार्गांनीं फिटण्यासारखें नाहीं.

किती सुंदर रीतीनें पुढील श्लोकांत या ऋणाचा उल्लेख करण्यांत आलेला आहे.

**नमोऽस्तु ते व्यास विशाल बुद्धे**
**फुल्लार विंदाय तपत्र नेत्र ।**
**एनत्वया भारत तैल पूर्णः**
**प्रज्वालितो ज्ञानमय प्रदीपः**

महाभारत म्हणजे ज्ञानाचें भांडार आहे. भांडारांत किती तरी दैदिप्यमान रत्नें आहेत. आणि त्या रत्नांतील कोहिनूर म्हणजे भगवद्गीता होय. या गीतेच्या द्वारें व्यासानीं जीवन सफल करण्याचा गुरुमंत्र आम्हांला देऊन ठेविला आहे. आम्हीं आध्यात्मिकतेचें शिखर कसें गांठावें, या व परलोकांत सर्वश्रेष्ठ स्थान आम्हीं कसें प्राप्त करून घ्यावें, हें त्यांनीं सांगितलें आहे.

आम्हीं आमच्या वाट्यास आलेलीं सारीं कर्मे निष्काम वृत्तीनें व समर्पण बुद्धीनें आचरावीं. फळाचा विचारच मनांत आणूं नये. आमचें मन आम्हीं नेहमीं पवित्र ठेवावें. त्याला कसलाही मळ लागू देऊं नये. मनाचें पावित्र्य संभाळण्यांत आलें म्हणजे ज्ञान प्राप्तीचा मार्ग सुलभ होत जाईल.

निष्काम वृत्तीनें कर्माचरण करीत असाचं आमच्याकडून भक्तिमार्गाचेंही आचरण व्हावें. या मार्गाला उद्देशून सांगितलें आहे की, 'मन्मना भव मदभक्तो, मद्याजी माम् नमस्कुरू' तुझें मन नेहमीं माझ्याठायीं लागून राहूंदे. माझी भक्ति कर. सतत माझें ध्यान कर मला नमस्कार कर अशारीतीनें भक्तिभावाची महती व्यासानीं वर्णन केली आहे. आम्हीं देवाची भक्ति कशी करावी व त्याला प्राप्त करून घ्यावें हेंच व्यासानी त्या श्लोकाच्या रूपानें सांगितलें आहे.

कलियुगांत माणूस नाना प्रकारच्या मायाजाळांत गुरफटून गेलेला आहे. त्याची चोंहोंकडून ओढाताण होत आहे. त्याला मग देवाची प्राप्ति व्हावी कशी ? ती भक्ति मार्गानेंच होण्याची शक्यता आहे. तो मार्ग कसा चोखाळावा याचें व्यासानीं फार चांगलें व सुबोध मार्गदर्शन केलें आहे. श्रीमत् भागवताच्या द्वारें हा भक्तिमार्ग आपणास सुलभतेनें समजूं शकतो.

स्वधर्माच्या द्वारें आम्हीं आमचें मन शुद्ध करावयाचें आहे. 'स्वधर्म' या शब्दांत अर्थ भरलेला आहे. आपण ज्या परिस्थितींत जन्म घेतला त्या परिस्थितीला अनुसरून आपल्या वाट्याला जें कर्तव्य आलें असेल तोच आपला धर्म. त्या धर्माचें पालन इमानें इतबारें करावयाचें, त्यांत कुचराई व लबाडी बिलकूल करावयाची नाहीं. आणि मग तुमचें शुद्ध मन ईश्वर भक्तीकडे आपोआप वळेल.

ब्रह्मसूत्रांच्या रूपानें व्यास महर्षींनीं आमच्या सार्‍या शंकांचें निरसन केलें आहे. त्यांत त्यांनीं उपनिषदांचें सारसर्वस्व आणिलें आहे. व्यासानीं आमच्यावर किती उपकार करून ठेविले आहेत ! केवढें ज्ञान भांडार त्यांनीं आमच्यापुढें उघडून ठेविलें आहे ! त्याचें वर्णन शब्दांनीं करतां येणें कोणालाहि शक्य नाहीं. महाभारत ( भगवद्गीतेसह ), भागवत व ब्राह्मसूत्रेंहि दिव्य व सर्व काळीं आमचें तारण करणारीं रत्नें त्यांनीं आम्हांला देऊन ठेविलीं आहेत.

माणूस कोणत्याहि वृत्तिचा असो. त्याचा व्यवसाय कोणताहि असो. त्यानें आपल्या जरुरीप्रमाणें या ज्ञानभांडाराचा उपयोग करून घ्यावा व आपलें जीवन सफल करावें. भगवान व्यासासारखा मार्गदर्शक व अचूक वाटाडया आणखी दुसर्‍या कोणत्या देशाच्या वाट्याला आला असेल असें वाटत नाहीं. आम्हां भारतवासीयांचें केवढें हें भाग्य ! भगवान् व्यासासारखा महान् वाटाडया आम्हांला लाभावा ही भगवंताची या देशावर खास कृपाच समजली पाहिजे. त्यांनीं आम्हीं असत्याकडून सत्याकडे कसें जावें, अंधकारांतून प्रकाशाकडे कसें जावें व मृत्युपासून मुक्तता करून घेऊन अमरत्वाप्रत कसें जावें याचा सुंदर मार्ग आम्हांला दाखवून दिला आहे.

भगवान व्यासाना आमचे शतशः प्रणाम !

—जगद्गुरु श्री शंकराचार्य, कांची यांच्या एका लेखाच्या आधारें.

---

# साधक आणि साधना

**मनाचा स्वभावच असा आहे कीं त्याला नाना प्रकारच्या सुखोपभोगांचें आकर्षण असतें. त्याचें निर्मूलन करतां आलें पाहिजे. या मनांच्या ओढाताणीमुळें मनुष्य पुन्हां पुन्हां जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडत असतो. त्या मनाला खेचून त्याला भगवंताकडे वळविणें हाच मोक्ष प्राप्तीचा मार्ग आहे. नामस्मरणाची कास धरल्यानें व चित्त त्याच ठिकाणी एकाग्र केल्याने हें सध्य होत असतें. हा शाश्वत सुखाचा मार्ग सोडून आपण क्षणिक सुखाला लाचावतों व शेवटीं फशीं पडतों. मग करायचें काय !**

चित्तशांति ही जीवनांतील बहुमोल गोष्ट आहे. ती आपण हर प्रयत्नानें साध्य करून घेतली पाहिजे. ती कशी बरें साध्य होईल ? त्या मार्गे लागल्यानें मार्ग सांपडतोच सांपडतो. नदी, सरोवर, समुद्र, डोंगर, पर्वत, वृक्षराजी यांच्या सान्निध्यांत राहिल्यानें व स्वतःला ईश्वर निर्मित सृष्टिसौंदर्याची आवड लावून घेतल्यानें मनाची एकाग्रता साध्य करता येते. आपले ऋषिमुनी लोकसमूहापासून फार दूर अरण्यांत वास्तव्य करीत असत ते उगाच नाहीं ! आपल्या सभोंवार वातावरण निरुपद्रवी असावें. भर वस्तींत वास्तव्य केल्यानें मन व्यग्र करणाऱ्या नाना गोष्टी घडतात. व मन त्यांत गुंतून जातें. सृष्टिसौंदर्याच्या सान्निध्यांत राहून त्या वातावरणाचा आपण योग्य तो उपयोग करून घेतला पाहिजे. खाणेंपिणें मेजवान्या झोडणें यांत वेळ घालविल्यानें आणखी उपाधि मार्गे लागत असतात. आपण आपला वेळ भगवन्नाम चिंतनांत, दानधर्मांत, सत्संगांत व नेमधर्माचें पालन करण्यांत खर्च करावयाचा. जड व ज्यामुळें आळस येईल असें भोजन घ्यावयाचें नाहीं. हलका साधा व सात्वीक आहार ठेवावयाचा. भगवंताचें नामस्मरण जेथें चाललें असेल तेथें आवडीनें जावें. स्वत; भगवंताचे भजन पूजन व चिंतन करावें. सर्वां बरोबर प्रेमानें वागावें. दुसऱ्यांस आनंद वाटेल सुख वाटेल अशी कृत्यें हातून घडावी. जे कोणी सत्कार्यांत गुंतले असतील त्यांना यथाशक्ति हातभार लावावा कोणाशींही बोलण्याचा प्रसंग आला असता शांत चित्तानें बोलावें वागावे. कोणी कोणावर राग करावयाचा ? कोणी कोणाची फसवणूक करावयाची ? सर्व भगवंताचो वेगवेगळीं स्वरूपें आहेत या भावनेनें आपण वागूं लागलों म्हणजे आपल्या हातून दुराचरण सहसा घडणार नाहीं. कोणाचाही अपमान किंवा तिरस्कार आपल्या हातून घडूं नये जें गरजवंतास देतां येण्यासारखें असेल तें द्यावे. दुसऱ्यांचें जितकें म्हणून भलें करतां येईल तेवढें करावें. यांतच आपलें भलें होण्याचा मार्ग सामावलेला असतो.

आपणाला साधना करावयाची आहे ना ? मग त्यासाठीं जरूर त्या गोष्टीची कास नको का धरायला ? कोणतीहि गोष्ट आपोआप घडत नसते किंवा आपल्या पदरांत सहजासहजीं पडत नसते. उद्योग, प्रयत्न चिकाटीपूर्वक केलाच पाहिजे. ईश्वर त्याचे फळ योग्य वेळीं दिल्याशिवाय रहाणार नाहीं, अशी मनाशीं खूणगांठ बांधून ठेवावी.

# माझें चिंतन—माझें स्मरण

तुम्हीं जसे वागाल तशीच तुम्हांला इतरांकडून वागणूक मिळेल. करावें, द्यावें तसें घ्यावें. 'जग हें आहे दिल्याघेतल्याचें.' नाहींपेक्षां या जगांत तुम्हांला कोणीही विचारणार नाहीं. करणें सवरणें ही आपल्या हातची गोष्ट आहे. त्याचें फळ कोणतें व कधीं मिळणार हें आपण सांगूं शकत नाहीं. तें ईश्वराच्या हातीं असतें. आपल्याकडून पुण्यकर्म घडलें असेल तर त्याचें फळ आपण सुखी होण्यांत मिळणार व आपल्याकडून पापकर्म घडलें असलें तर त्याचें फळ दुःखाच्या रूपानें मिळणार ही गोष्ट मात्र निर्विवाद आहे. तेव्हां आपण काय करायचें ? सत्कृत्येंच करीत रहावयाचीं. नेहमीं आपल्या हातून घडतील तेवढीं चांगलीं कृत्यें करीत रहावयाचीं व तोच आपण आपला धर्म मानिला पाहिजे.

हीच वेळ सत्कृत्यें करण्याची आहे. पुन्हां अशी वेळ मिळणार नाहीं. आपला मोकळा वेळ वायफळ गप्पा मारण्यांत किंवा कोणत्याही प्रकारचे वेडे चाळे करण्यांत न दवडतां देवाचें चिंतन, नामस्मरण करण्यांत खर्च कर. तुझ्याजवळ जें कांहीं देण्यासारखें असेल तें परोपकारार्थ खर्च कर. पैसा असो; ज्ञान असो किंवा दुसरें कांहीं असो. त्याचा लोभ बाळगूं नकोस. द्रव्य असल्यास संकटांत सांपडलेल्यांसाठीं खर्च कर. बुद्धिमत्ता असल्यास वाट चुकलेल्यांस मार्ग दाखव. जे दुःखी असतील, त्यांचा दुःखभार हलका करण्यासाठीं मनापासून झट. देवाची मर्जी, देवकृपा संपादन करण्याचा हा राजमार्ग आहे. तुझें मन विषयवासनेमागें सैरावैरा धांवत असेल तर प्रेमानें त्याला ईश्वर चरणाकडे वळीव. भगवंताचें सतत नामस्मरण कर. त्यामुळें तूं शाश्वत सुखाचा व समाधानाचा मानकरी होशील.

अरे, कुटुंबियांचें भरणपोषण व विषयोपभोग कोण करीत नाहीं ? पशुपक्षीही करतात ! मग तुझ्यांत आणि त्यांच्यात फरक तो काय राहिला ? जरा जागा हो; थोडा तरी विचार कर. समजूं लागल्यापासून तूं स्वार्थाच्यामागें लागून कुटुंबपोषणासाठीं व स्वतःच्या सुखोपभोगांसाठीं झटत आहेस; तीळ तीळ तुटत आहेस. सारें रक्त व शक्ति आटवीत आहेस. ज्यांच्यासाठीं तूं हें सारें केलेंस, ज्यांच्यासाठीं सारें आयुष्य खर्च केलेंस, त्यांपैकीं शेवटच्या घडीला कोण येणार आहेत तुझ्याबरोबर ! सगळें जागच्या जागीं राहील. आणि तुला हात हालवीत एकट्यालाच जावें लागेल ! मग बरोबर काय येईल तुझ्या ? जें कांहीं पुण्य किंवा पाप हातून घडलें असेल तेंच बरोबर येईल. यासाठीं रोज कांहीं ना कांहीं पुण्यकर्म करीत जा. जें जें करशील तें तें भगवंताच्या नांवें करीत जा. तोच मार्ग उद्धार करणारा आहे, याची पक्की खूणगांठ बांधून ठेव.

**जो मजलागीं अनन्यशरण । विश्वासयुक्त करी मद्भजन ।**
**माझें चिंतन, माझें स्मरण । तयाचें उद्धरण ब्रीद माझें ॥**

हें भगवंताचें व श्री साई बाबांचें वचन त्रिवार सत्य आहे.

---

२५४

# सद्‌गुरु कृपेचें केवढें हें महात्म्य !

—श्री रमण महर्षि

श्री. रमण महर्षि हे आधुनिक काळांतील एक थोर सत्पुरुष होत. अध्यात्म क्षेत्रांतील ते श्रेष्ठ मानकरी होते. सद्‌गुरु व गुरुकृपा याच्यासंबंधीं एका शिष्यानें त्यांना कांहीं प्रश्न विचारले असतां त्यांना दिलेल्या उत्तरांचें सार येथें आमच्या वाचकांसाठीं देण्यांत येत आहे. —संपादक

### सद्‌गुरुचीं प्रमुख लक्षणें कोणतीं ?

**श्री रमण महर्षिः**—सद्‌गुरु स्वयंकेंद्रित असतात. ते नेहमीं सच्चिदानंद स्वरूपांत तल्लीन असतात. त्यांचा सर्वांठायीं समभाव असतो. तेथें भेदभावाला बिलकूल स्थान नसतें. कितीही आणिबाणीचा बिकट प्रसंग येवो; आकाश कोसळो; ते विचलीत होत नाहींत ! ते आपल्या स्थानीं स्थीर असतात.

### 'सत्‌शिष्य कसा असतो ?'

**श्री रमण महर्षिः**—या जगांतील सर्व प्रकारच्या क्षणिक किंवा दीर्घकालीन दुःखांपासून सुटका करून घेण्यासाठीं तो धडपडत असतो. त्याला शाश्वत सुखाची तहान लागलेली असते. कोणत्याही प्रकारच्या सुखोपभोगाकडे त्याचें लक्ष नसतें.

### सद्‌गुरुच्या शिकवणीचें स्वरूप काय असतें ?

**श्री रमण महर्षि**—गुरू उपदेश करतो म्हणजे काय करतो माहीत आहे ! उपदेश म्हणजे तुम्ही स्थानभ्रष्ट झालेले असतां, तुम्ही आपल्या खऱ्या स्थानापासून च्युत झालेलें असतां; दूर दूर गेलेले असतां. सैरावैरा इतस्ततः भटकत असतां. गुरू तुमचे कान धरून परंतु प्रेमानें त्या स्थानावर आणून सोडतो. तुझे आहे तुजपाशीं । परि तूं जागा चुकलासी ।। अशीं झालेली असते तुमची स्थिति ! आणि तुम्ही परत स्थानभ्रष्ट होऊं नये, त्या स्थानाला चिकटून रहावें अशी योजना घडवून आणतो. तुम्ही आत्मारामाला विसरून गेलेले असतां. आत्माराम का तुमच्यापासून दूर असतो ? तो अगदीं सन्निध असतो; परंतु जवळ असूनहि केवळ अज्ञानामुळें तुमच्यांत व त्यांच्यांत जें अंतर पडलेलें असतें तें तोडून टाकण्याचें महाकार्य गुरुजी पार पाडतात.

'मनुष्य कितीही ज्ञानी असो, पंडित असो वा शास्त्रपारंगत असो, त्याच्या ठिकाणीं अलौकिक शक्तीचा संचार झालेला असो. परंतु आत्मज्ञानाची, ब्रह्माची जी ओळख व्हावी लागते, ती मात्र सद्‌गुरूच्या कृपेशिवाय होत नाहीं, असें सर्व शास्त्रें सांगत असतात. त्यांत कितीसें तथ्य आहे ?

**श्री रमण महर्षि :** सर्व प्रकारचें ज्ञान मिळविलें तरी आत्मज्ञान मिळविण्याच्या मार्गांत नाना प्रकारचे अडथळे असतात. त्याच्यावर अज्ञानाची पुटांवर पुटें चढलेलीं असतात. तीं गुरुकृपेशिवाय नाहींशीं होऊं शकत नाहींत. शास्त्रें सांगतात ते अगदीं खरें आहे. गुरुकृपेच्या छावलींत वावरल्याशिवाय आत्मारामावर जो प्रकाश पडावयाचा तो पडूं शकत नाहीं. गुरुकृपाच सभोंवार पसरलेला काळोख नाहींसा करून प्रकाशाकडे घेऊन जाण्यास समर्थ आहे. तमसो मा ज्योतिर्गमय ' हें त्यांचेच महनीय कार्य आहे.

सद्गुरुच्या कृपाछत्राखालीं वावरत असतां मनाचें सैरावैरा धांवणे पळणें बंद पडतें. एखादा महापंडित कीं जो आपल्या ज्ञानाच्या गर्व भारानें वाकून गेलेला असतो, त्याला विचारावें कीं अरे बाबा ! तूं एवढा ज्ञानसंपन्न झालास, सारीं शास्त्रें मुखोद्गत केलींस, परंतु तुला स्वतःची ओळख पटली आहे का ? तो काय उत्तर देणार ? त्यावेळीं त्याला मान खालीं घालावी लागेल ! यावरून काय समजायचें ? कितीही उच्चांतील उच्च ज्ञान मिळवून तुम्हीं उच्चांक गांठला तरी तुम्हांला आत्मज्ञान सद्गुरुच्या कृपेशिवाय प्राप्त होणार नाहीं.

' गुरुकृपेचें स्वरूप कशा प्रकारचें असतें.

**श्री रमण महर्षि :** काय सांगूं ? त्याचें स्वरूप शब्दांनीं वर्णन करून सांगण्याच्या पलिकडचें असतें यावरून जें काय सममजायचें तें समजा.

---

# श्रीसाईनाथ वाचनालय, शिर्डी

## भक्तांकडून देणगीदाखल आलेलीं पुस्तकें

| अ. नं. | नांव | पत्ता | पुस्तकें | पुस्तकांचीं नांवें |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. दास गोविंद | नागपूर | २ | गजानन भजन माला ( द्वितीयपुष्प, तृतियपुष्प ) |
| २ | कु. अंजली बाजीराव कोते | शिर्डी | १ | अकुलीनता ( कादंबरी ) |
| ३ | श्री. धनराज प. तोडरवाल | ,, | ७ | पुस्तकें ( कादंबऱ्या ) |
| ४ | ,, हरीदास गो. कुळकर्णी | सांगली | २ | १) वाल्मीकी रामायण (जुनी पोथी) २) वासूदेव सप्तशती (—,,—) |
| ५ | वाचक मित्र मंडळ | शिर्डी | १ | सावटांतलें रोप |
| ६ | ऑल इंडिया साई समाज | मद्रास | ३ | लाईफ ऑफ साईबाबा (भाग१,२,३) |
| ७ | श्री. डी. एस. सॅमसन | मुंबई | ७ | कल्याण कल्पतरू मासिकें ( इंग्रजी ) |
| ८ | श्री. शिवनेस स्वामी | कोईमतूर | १ | श्रीधरस्वामीमहाराज चरित्र |
| ९ | श्री. गजानन शास्त्री अंजनवातीकर | कोपरगांव | | 'श्रीसद्गुरुबाबा' यांचे चरित्र मराठी |
| १० | श्री. लक्ष्मण के. कुंभार | धुळें | यांनी | दैनिक ' लोकमित्र ' सुरू केलें |
| ११ | श्री. काशिनाथ बंडू सरोदे | नांदगांव | ,, | साप्ताहिक गांवकरी व स्क्रीन सुरू केलें |
| १२ | भीमाशंकर बा. रत्नपारखी | शिर्डी | ,, | मासिक ' एकता ' सुरू केलें |

---

# यंदाचा श्रीगुरुपौर्णिमाउत्सव

श्रीसच्चिदानंद सद्गुरुसाईबाबा यांचा श्रीगुरुपौर्णिमाउत्सव सालाबादप्रमाणें यंदा मिती आषाढ शु॥ १३ बुधवार दिनांक २६।७।६१ ते आषाढ व॥ १ शुक्रवार दिनांक २८।७।६१ पावेतो तीन दिवस मोठ्या थाटांत साजरा झाला.

दिनांक २६।७।६१ बुधवार रोजी नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त पहांटे ६ वाजल्यापासून श्रींचे द्वारकामाईंत दुसरे दिवशीं म्हणजे दिनांक २७।७।६१ च्या पहाटे ६ वाजेपर्यंत चोविस तास सतत श्रीसाईनाम संकीर्तन भजन व श्रीसाई सच्चरित्र अध्याय ५३ यांचें अखंड वाचन श्रींचे फोटोची व श्रीसाई सचरित्र पोथीची मिरवणूक होऊन समाप्त झालें. दिनांक २६।७।६१ रोजी दुपारी ४ ते ६ पर्यंत श्री. ह. भ. प. भैरव अनंत काळे सातारा यांचें कीर्तन, श्रींचे कापडाची विक्री, रात्रौ गांवांतून श्रींचे पालखीची मिरवणूक गारुड भजन व कांहीं कलाकारांची हजेरी, नेहमींचे दरांत पक्कान्न भोजन वगैरे कार्यक्रम यथासांग पार पडले.

दिनांक २७।७।६१ गुरुवार रोजीं नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त सामुदायिक अभिषेक पूजन अर्चन ( भक्तांचे ) झाले. जुन्या कापडाची विक्री, नेहमींचे दरांत भक्तांना पक्कान्न भोजन, दुपारी ४ ते ६ पर्यंत श्री संगीत सत्यनारायणमहापूजा;( कीर्तन ) सर्व भक्तांना तीर्थप्रसाद, रात्रौ श्रींचे रथाची गांवांतून मिरणुक व ( गुरुवारची चावडी ) गारुड भजन बँड वाद्न चौघडा सूर सनई वादन व शोभेचे ( दारुकाम ) रात्रौ ९ ते पहाटे ६ वाजेपर्यंत श्रींचें समाधीसमोरील मंडपात कलाकारांची हजेरी रात्रभर जागर गायनवादन नकला नृत्य वगैरे कार्यक्रम झाले.

दिनांक २८।७।६१ शुक्रवार रोजीं नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींचे जुन्या कापडाची विक्री सकाळी १० ते १२ पर्यंत, स. गवई मराठे यांचे गोपाळ काला कीर्तन, दही हंडी व उत्सव समाप्त झाल्याची ( घोषणा ) दुपारीं नेहमीचे दरांत भक्तांना भोजन, रात्रौ मुंबईच्या गाईका कु. वसुंधरा श्रीखंडे यांचें गायन व साकोरीचे श्री. पंडित जगन्नाथ बुवा सुरतकर यांचे शास्त्रोक्त गायन होऊन उत्सव समाप्त झाला.

यंदाचे सालीं उत्सवगर्दी बरीच होती. त्यांत खानदेश, वऱ्हाड, नागपूर मराठवाडा या ठिकाणचे पुष्कळ भक्त पंढरपूरची यात्रा आटोपून शिर्डीस आले होते. सुमारें ४० कलाकारानीं श्री पुढें हजेरी दिली. त्यांत पुण्याचें श्री. वसंतराव देवळकर श्री. माधवराव दैठणकर असे नामांकित सनई सुंदरी वादनकार ८।१० होते व श्री. श्रीपाद साठे खंडाळा यांचे गीत रामायण व श्री. एस. जी. कुळकर्णी टिळकनगर व्हायोलीन वादन चांगलीं झालें. तसेंच श्री. रघुनाथ साडेभोर पुणें यांचे गारुड नृत्य व नकला उत्तम झाल्या. कु. वसुंधरा श्रीखंडे मुंबई, श्रीपंडित जगन्नाथबुवा सुरतकर मु. साकोरी यांचें गायन फारच उत्तम झालें. श्री. डी. के. माणिकबाई रायचुर, यांचे कव्वाली गायनही

चांगलें झालें. उत्सवाकरितां मुद्दाम मांडव मोठे दोन व नक्षीच्या कमानी तोरणेपताका विजेच्या दिव्याची रोषणाई श्रींचे कळसावर व इतर ठिकाणीं केलेली होती. उत्सवांत मुख्य दिवशीं पर्जन्यमहाराजानींही जोरदार हजेरी श्रींचे आरतीचे वेळीं देऊन भक्तांची थोडीशी धांवपळ केली.

ज्या भक्तांनीं तन, मन, धन, श्रींची सेवा केली, त्या सर्वांचें महाराजांनीं कल्याण करावें ही प्रार्थना.

---

# श्रीसाई संस्थानला मिळालेल्या देणग्या

श्रीसाईबाबा संस्थानला चेक, बी. पी. ओ. रूपानें देणगी दिलेल्या भक्तांची यादी साभार प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. एम्. के. कारवारकर | नवी दिल्ली | रुपये | १०१–०० |
| २) | ,, बी. डी. पटेल | नॉ. रोडे | शिलींग | १००–०० |
| ३) | ,, रतीलाल भूराभाई | नैरोबी | रुपये | ५०–०० |
| ४) | ,, टी. एन्. नायर | | शिलींग | १५–०० |
| ५) | ,, टी. सी. चव्हाण | नैरोबी | पौंड–१ शिलींग | १५–०० |
| ६) | ,, एस. थिरूमाळी | मुंबई–१ | रुपये | १००–०० |
| ७) | ,, सुरेश आर. कन्डाजी | सॅनफ्रान्सीसको | डॉलर्स | ५०–०० |
| ८) | ,, अमृतलाल के. देसाई | सा. आफ्रिका | शिलींग | १०–०० |
| ९) | ,, पुरुषोत्तमदास मणीलाल | शिहारे, इंडिया | रुपये | २००–०० |
| १०) | ,, ब्रिजनंदन अझाद | कडमकामा, पाटणा | ,, | १००–०० |
| ११) | ,, डॉ. जी. कृष्णन् | मदूराई | ,, | ५०१–०० |
| १२) | श्रीमती एच. पुष्पलता | हैद्राबाद | ,, | १००–०० |
| १३) | श्री. भगवानदास सी. पटेल | नैरोबी | शिलींग | १५–०० |
| १४) | ,, आ. एन्. मेहता | कंपाला | पौंड-२ शिलींग | १०–०० |
| १५) | ,, हारवे व्यंकट गोविंदराज | मुंबई १६ | रुपये | १००–०० |
| १६) | ,, एम्. के. लक्ष्मण | वॉशिंग्टन | ,, | ५१–०० |
| १७) | डॉ. टी. एस. वीरारागव्हण | कालीकत, मद्रास | ,, | १०१–०० |
| १८) | श्री. चंदूलाल बी. पारेख | ,, ,, | ,, | १०००–०० |
| १९) | जे. व्ही. ठक्कर | नैरोबी | ,, | १००–०० |
| २०) | मिस कांता | ,, | ,, | ५०–०० |
| २१) | श्री. व्ही. एच. पटेल | Monx N. R. | शिलींग | [illegible] |
| २२) | ,, गो. मा. देशपांडे | महाल नागपूर | रुपये | |

---




# जुलै १९६१

या महिन्यांत भक्तांची गर्दी बरीच कमी होती. फक्त गुरुपौर्णिमाउत्सव गुरुवार व रविवार या दिवशीं गर्दी होत असे. कांहीं कलावंतांनीं श्रीपुढें हजेरी दिली, ती खालील प्रमाणेंः—

**कीर्तन :** श्री. ह. भ. प. जेऊरकरबाबा मु. जेऊर. श्री. ह. भ. प. गंगामाई देशमुख मु. नाशिक, श्री. ह. भ. प. वसंतबुवा पंडित मुं. शेंदुर्णी जि. जळगांव, श्री. मराठे सं. गवई यांचीं दोन कीर्तनें एकादशी निमित्त झालीं.

**गायन :** श्री. भानुदास ज्ञानेश्वर जोशी मु. नांदगाव, खंडेश्वर जि. अमरावती. श्री. विश्वनाथ विठोबा माळी मु. नांदगांव खंडेश्वर जि. अमरावती. श्री. हरिश्चंद्र गायकवाड मु. सोलापूर, श्री. जगन्नाथ पंडित सुरतकर, साकोरी संस्थान गवई, वसुंधरा श्रीखंडे मुंबई

**नृत्य :** कुमारी कौसल्या भास्कर अय्यर माटुंगा. मुंबई.

**मोठ्यांच्या भेटी :** माननीय ना. वानखेडे, अर्थमंत्री यानी शिर्डीस भेट दिली.

हवापाणी ठीक आहे. पाऊस विशेष नाहीं.

---

## श्रीसाईभक्तांस सूचना

साईभक्तांस कळविण्यांत येतें कीं, विठ्ठल मांजरेकर या नांवाचा इसम संस्थान मध्यें कांहीं दिवस नोकरीस होता. गेलें ४।५ महिन्यापासून तो संस्थानच्या नोकरीत नाही. तो भक्तांना संस्थानचा नोकर भासवून फसवीत असल्याचें आमचे नजरेस आणण्यांत आलें आहे. तरी त्याचेपासून सावध रहावें संस्थानशीं त्याचा कांहीं संबंध नाहीं.

—व्यवस्थापक-शिर्डी संस्थान

---

—साईनिकेतनमध्यें भजनाचा कार्यक्रम—ता. २७-७-१९६१ (गुरुवार) श्रीगुरुपौर्णिमेच्या दिवशीं श्रीसाईबाबा शिरडी संस्थानच्या मुंबई येथील कचेरींत अर्थात् **साई-निकेतन दादर** येथें सुप्रसिद्ध हनुमान भजन मंडळीचें सुश्राव्य भजन रात्रौ ९ ते ११ वाजेपर्यंत झालें. भजनांत मुख्यतः श्रीज्ञानेश्वरमाऊलीची व श्रीसाईमाऊलीची भजनें म्हणण्यांत आलीं. कार्यक्रम ठीक झाला.

---

# श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | | किंमत रु. न.पै. |
|---|---|---|
| ( १ ) | श्रीसाईसच्चरित ( मराठी ) | ७.०० |
| ( २ ) | श्रीसाईसच्चरित ( हिंदी ) | ४.५० |
| ( ३ ) | श्रीसाईसच्चरित ( इंग्रजी ) | ४.०० |
| ( ४ ) | श्रीसाईसच्चरित ( गुजराथी ) | ३.७५ |
| ( ५ ) | श्रीसाईसच्चरित ( कानडी ) | ३.०० |
| ( ६ ) | श्रीसाईनाथ - स्तवनमंजरी | ०.१२ |
| ( ७ ) | दासगणूकृत ( ४ अध्याय ) | ०.५० |
| ( ८ ) | सगुणोपासना | ०.२५ |
| ( ९ ) | प्रधानकृत साईबाबा शिर्डी ( इंग्रजी ) | १.०० |
| (१०) | श्रीसाईलीलामृत | २.०० |
| (११) | श्रीसाईसुमनांजलि | ०.०६ |
| (१२) | कीर्तनपंचक | १.५० |
| (१३) | शीलधी | ०.७५ |
| (१४) | साईबाबा अवतार व कार्य | २.०० |
| (१५) | श्रीसाईगीतांजली | ०.१२ |
| (१६) | रुद्राध्याय ( ११ वा ) | ०.१२ |

( पोस्टेज निराळें )

वरील पुस्तकांकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

१ सरकारकून, श्रीसाईबाबा संस्थान, पोष्ट-शिरडी, जि. अहमदनगर.

२. मुंबई ऑफिस, साई निकेतन, प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.